सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा
7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १८.०७.२०२६ | अंक नं. ०९३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाळाजी देडगांवकर सराफ अँण्ड ज्वेलर्स
Since 1935
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर. फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी › खरेदीवर पॉइंट › पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

IGI सर्टीफाईड डायमंड ज्वेलरी आता आपल्या बजेटमध्ये !
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ १९९/-*
Conditions Apply*

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
Enroll Now www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा — आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर. 9371051769
जुने बस स्टँड शाखा — अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी, अ.नगर. 9371151769
पाईपलाईन शाखा — रुपा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर 7447761769

आमचे स्नेही
पै.वैभव वाघ
आपणांस वाढदिवसाच्या शुभेच्छा
दिपक दांगट
बडेभोले फुटाणेवाले सर्जेपुरा । पाईपलाईन रोड

मान्सून सेल
10 ते 50% डिस्काऊंट
श्री गुरुकृपा
सुटिंग । शर्टिंग । साडी
3423, खिस्तगल्ली, अहिल्यानगर. मो. 8686895959
Raymond Siyaram's Reid & Taylor VERCELLI J.HAMPSTEAD Carolon Luthai LINEN CLUB Arvind RUBY RAMRAJ ONLY VIMAL

|| हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे || हरे राम हरे राम राम राम हरे हरे ||
ISKCON अहिल्यानगर
आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन)
संस्थापकाचार्य - कृष्णकृपामूर्ति श्री श्रीमद ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद
श्री जगन्नाथ स्वामी नयन पथगामी भवतु मे..
श्री जगन्नाथ रथयात्रा
सप्तम वर्ष
जो भक्त भगवान श्री जगन्नाथांच्या दिव्य स्वरूपाचे दर्शन घेतो, तो केवळ उत्सव, यज्ञ आणि दान यांचेच पुण्य प्राप्त करत नाही, तर जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्तीच्या मार्गावरही अग्रसर होतो.
रविवार, 19 जुलै 2026
रथयात्रा प्रारंभ: दुपारी 2 वा.
महाप्रसाद: संध्याकाळी 7 पासून...



रथयात्रा मार्ग: श्री मार्कण्डेय संकूल, नेप्ती नाका, दातरंगे मळा (प्रारंभ) › दिल्ली गेट › चौपाटी कारंजा › चितळे रोड › नेता सुभाष चौक › नवी पेठ रोड › अर्बन बँक रोड › जुना बाजार रोड › कापड बाजार रोड › तेलीखुंट रोड › सीताराम सारडा स्कूल रोड › सिद्धी बाग चौक › दिल्ली गेट › श्री मार्कण्डेय संकूल, नेप्ती नाका, दातरंगे मळा (समापन).
सायं. 7:00 वा. – दीपदान व महाआरती | सर्वांसाठी महाप्रसाद | कथा व सांस्कृतिक कार्यक्रम
सुशोभित रथ व आकर्षक पुष्पसजावट | हरिनाम संकीर्तन | सर्वांसाठी महाप्रसाद | दीपदान व भक्तिमय वातावरण | सांस्कृतिक कार्यक्रम व कथा
संपूर्ण परिवारासह या, रथ ओढण्याच्या दिव्य सेवेत सहभागी व्हा आणि प्रभूंच्या असीम कृपेचे भागीदार बना!

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# सोनम वांगचुक यांचे '२१ दिवसांचे उपोषण' पोलिसांकडून स्थगित; रुग्णालयात दाखल



नवी दिल्ली – ज्येष्ठ पर्यावरणवादी, शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे जंतर मंतर येथे गेल्या २१ दिवसांपासून आमरण उपोषण सुरु होते. दरम्यान १८ जुलै रोजी सकाळीच साध्या वेशातील पोलीस उपोषणस्थळी आले आणि त्यांनी एका पांढऱ्या चादरीत गुंडाळून वांगचुक यांना रुग्णवाहिकेतून दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना अशक्तपणा आणि शरीरातील पाण्याची कमतरता असल्याचे सांगत उपचार सुरु केल्याचे सांगितले.

रुग्णालय प्रशासनाने जारी केलेल्या मेडिकल बुलेटिननुसार, दीर्घकाळ उपोषणामुळे सोनम वांगचुक यांचे शरीर कमजोर झाले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी त्यांना वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. डॉक्टरांची विशेष टीम त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून असून, आवश्यक उपचार करण्यात येत आहेत.

## साध्या वेशातील पोलिसांनी चादरीत गुंडाळून नेले

दरम्यान या गदारोळात कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनीही जंतर–मंतर येथे उपोषण सुरू करण्याची घोषणा केली. ते म्हणाले, पोलिसांनी सोनम वांगचुक यांना अपशब्द वापरले आणि बळजबरीने रुग्णालयात नेले. त्यांनी माझ्यावरही हात उचलला. आम्ही पेपरफुटी प्रकरणाची चौकशी आणि शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणी करीत आहोत. त्यासाठी वांगचुक उपोषण करत आहेत. त्यांची प्रकृती सातत्याने खालावत चालली होती आणि त्यांचे वजन सुमारे ९.५ किलोंनी घटले आहे.

### पत्नी गीतांजली यांनाही रोखले

सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांच्या पत्नी गीतांजली यांनी त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना भेटू दिले नसल्याचे सांगण्यात येते. वांगचुक यांना कोणतेही तोंडावाटे किंवा सलाईनद्वारे औषध अथवा उपचार देण्यापूर्वी त्यांची, कुटुंबीयांची आणि गेल्या २० दिवसांपासून त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवणाऱ्या डॉक्टरांची संमती घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### अभिजित दीपके यांचे उपोषण सुरू

सोनम वांगचुक यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी उपोषण सुरू केले आहे. यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर तीव्र टीका केली. अभिजित दीपके म्हणाले की, या देशात अनेक महान नेते आणि पंतप्रधान होऊन गेले. मात्र सध्याच्या परिस्थितीमुळे या पदाचा अवमान होत आहे. यापूर्वी आम्ही केवळ धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत होतो. मात्र आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही राजीनामा द्यावा, असे ते म्हणाले.

## चांगल्या कंपन्यांवर विश्वास असेल, तर इतक्या योजनांची गरजच काय?



राजन कुटे

गुंतवणूकदारांशी संवाद साधताना एक प्रश्न वारंवार समोर येतो– जर आपण चांगल्या कंपन्यांमध्येच गुंतवणूक करायची असेल, तर इतक्या अनेक म्युच्युअल फंडांची गरज तरी काय? पहिल्या नजरेत हा प्रश्न अगदी योग्य वाटतो.

गुंतवणुकीत विविधता (Diversification) महत्त्वाची आहे, हे आपण वारंवार ऐकतो. कारण विविधता आपल्याला एका कंपनीवर, एका क्षेत्रावर किंवा एका प्रकारच्या जोखमीवर अवलंबून राहण्यापासून वाचवते.

परंतु कधी कधी विविधतेच्या प्रयत्नात आपण इतक्या अनेक योजनांमध्ये गुंतवणूक करतो की, विविधतेचा मूळ उद्देशच हरवून बसतो.

प्रत्येक नवीन योजना पोर्टफोलिओमध्ये नवी भूमिका बजावते आहे का, की आधीपासून असलेल्या गुंतवणुकीचीच पुनरावृत्ती करते आहे, हा प्रश्न स्वतःला विचारणे अधिक महत्त्वाचे ठरते.

गुंतवणुकीत योजना वाढत गेल्या म्हणजे गुणवत्ता वाढतेच असे नाही. अनेक वेळा त्यातून समान प्रकारच्या कंपन्यांमध्ये पुन्हा पुन्हा गुंतवणूक होते. परिणामतः पोर्टफोलिओ मोठा दिसतो, पण तो अधिक परिणामकारक होईलच असे नाही.

याचा अर्थ कमी योजना असाव्यात किंवा जास्त योजना चुकीच्या असतात, असा अजिबात नाही.

प्रश्न योजनांच्या संख्येचा नसून, प्रत्येक योजनेची भूमिका स्पष्ट आहे का, हा आहे.

जशी एखाद्या संघातील प्रत्येक खेळाडूची भूमिका वेगळी असते, तशीच पोर्टफोलिओमधील प्रत्येक योजनेचीही एक ठरलेली जबाबदारी असावी. दोन खेळाडू एकच काम करत असतील, तर संघ अधिक मजबूत होत नाही; उलट अनावश्यक गुंतागुंत वाढते.

म्हणूनच वेळोवेळी पोर्टफोलिओकडे पुन्हा पाहणे आवश्यक असते. साधारण तीन वर्षांतून एकदा केलेला आढावा अनेकदा पुरेसा ठरतो. बदल हा नेहमी नवीन योजना जोडण्यात नसतो; कधी कधी आधीच असलेल्या गुंतवणुकीची भूमिका अधिक स्पष्ट करण्यात ही असतो.

शेवटी प्रश्न इतकाच–

आपल्या पोर्टफोलिओमध्ये प्रत्येक योजना एखादे वेगळे काम करते आहे का, की आपण फक्त योजनांची संख्या वाढवत आहोत?

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# उपोषणकर्ते सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने उचलून नेणारं नरेंद्र मोदी यांचे सरकार डरपोक

## नजीकच्या काळामध्ये भारताचा नेपाळ झाल्याशिवाय राहणार नाही, हा वनवा आता सरकार रोखू शकत नाही

नगर – नीट पेपर फुटी नंतर तब्बल वीस पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. २१ जूनला झालेल्या फेर परीक्षेकडे तब्बल पावणेदोन लाख विद्यार्थ्यांनी नैराश्यातून पाठ फिरवली. देशातील तरुणाईच्या भवितव्याच्या सुरक्षिततेसाठी राजकारण विरहित राष्ट्रीय स्तरावरच आंदोलन दिल्लीमध्ये वैज्ञानिक तथा शिक्षण तज्ञ सोनम वांगचुक, अभिजीत दिपके यांच्यासह हजारो तरुणांनी उभं केलं आहे. त्यांच्या आमरण उपोषणाचा एकविसावा दिवस होता. मात्र आंदोलन चिरडण्यासाठी त्यांना जोर जबरदस्तीने उचलून नेत रुग्णालयात डांबण्यात आल आहे. वांगचुक यांना जबरदस्तीने उचलून नेणार मोदी सरकार हे डरपोक असल्याची टीका ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

केंद्र सरकारच्या या कृतीमुळे देशभरामध्ये संतापाची लाट उसळली आहे. काळे म्हणाले, देशात लोकशाही उरलेली नाही. मागच्या वीस दिवसात सरकारचा एकही प्रतिनिधी साधा फिरकला सुद्धा नाही. आंदोलकांशी संवाद साधण्या ऐवजी दडपशाही केली जात आहे. तरुणाईचा आवाज बनलेले अभिजीत दिपके यांना झालेली मारहाण, आंदोलन स्थळी युवती आंदोलकांशी केलेले गैरवर्तन, विद्यार्थ्यांवर केलेला लाठीचार्ज यातून देशामध्ये नवा हिटलर जन्माला आला आहे हेच सिद्ध होते. सरकारची हीच भूमिका कायम राहिली तर नजीकच्या काळामध्ये भारताचा नेपाळ झाल्याशिवाय राहणार नाही. हा वनवा आता सरकार रोखू शकत नाही. सरकारच्या या दडपशाहीचा आम्ही तमाम अहिल्यानगरकर आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करतो.



किरण काळे

### आंदोलन राजकारण विरहितच रहावे

तरुणाईच्या भवितव्याच्या संरक्षणासाठी उभे राहिलेले हे आंदोलन राजकारण विरहित आहे. ते तसेच राहणे आवश्यक आहे. वांगचुक यांना मागील दोन दिवसांपासून देशभरातून प्रचंड मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. तरुणाई, नागरिक स्वयंस्फूर्तीने रस्त्यावर उतरत आहेत. अहिल्यानगर शहरात देखील शुक्रवारी सायंकाळी शेकडो विद्यार्थी, विद्यार्थिनी, सजक नागरिकांनी काढलेला कॅन्डल मार्च समाजाची यावर असणारी तीव्र भावना व्यक्त करणारा आहे. या आंदोलनाला आम्ही ठाकरे शिवसेनेच्या वतीने पाठिंबा दिला आहेच. परंतु राजकीय नेते, कार्यकर्ते यांच्यापेक्षा सर्वसामान्य नागरिकांनीच या आंदोलनाचा चेहरा व्हावे, असे आमचे स्पष्ट मत आहे. अहिल्यानगरसह देशात ठिणगी पडली आहे. आता हा वनवा सरकार रोखू शकत नाही, असे किरण काळे यांनी म्हटले आहे.

### मोदी सरकार असंवेदनशील

नैतिकतेच्या मुद्द्यावरून यापूर्वी अनेक मंत्र्यांनी राजीनामा दिल्याची उदाहरण आहेत. रेल्वे अपघातात शेकडो नागरिकांचा बळी गेला म्हणून तत्कालीन रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री, एलआयसी घोटाळ्याच्या मुद्द्यावरून तत्कालीन अर्थमंत्री कृष्णमाचारी, भारत–चीन युद्धाच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून तत्कालीन संरक्षण मंत्री के. कृष्ण मेनन यांच्या सह अनेक मंत्र्यांनी राजीनामा दिल्याची उदाहरण आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा यापूर्वीच घ्यायला हवा होता. प्रधान यांनी देखील पायउतार व्हायला हवे होते. डीलिमिटेशन विधेयक मंजूर करण्यासाठी देशभर खासदार फोडाफोडी, राम मंदिराची तिजोरी लूट यामध्ये मशगूल असणारे सरकार नींदेस पात्र आहे. मोदी सरकार असंवेदनशील टीका काळे यांनी केली आहे.

# महिलेला मारहाण करून सोन्याचे दागिने हिसकावले

## सहा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील बाबुर्डीबेंद येथे पूर्ववैमनस्यातून एका महिलेला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना १६ जुलै रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली आहे. 'आमच्यावर गुन्हा का दाखल केला?' असा जाब विचारत आरोपींनी फिर्यादी महिला आणि तिच्या कुटुंबीयांना बेदम मारहाण केली. एवढेच नव्हे तर, भांडणाचा फायदा घेऊन आरोपींनी महिलेच्या गळ्यातील ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनीगंठण जबरदस्तीने हिसकावून नेले. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात ६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ज्योती शरद चोभे (वय ३०, रा. बाबुर्डी बेंद, ता.नगर) यांनी फिर्याद दिली असून त्या फिर्यादी वरून पोलिसांनी दत्ता पोपट चोभे, प्रकाश पोपट चोभे, कुमार हनुमंत चोभे, रोहित मच्छिंद्र मोहिते, दत्तात्रय राजू उर्फ गोविंद चोभे आणि अनिकेत राजू उर्फ गोविंद चोभे (सर्व रा. बाबुर्डी बेंद, ता. नगर) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

आरोपींनी फिर्यादी महिला व इतरांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या झटापटीत आरोपी दत्ता चोभे याने महिलेच्या गळ्यातील अर्धा तोळा वजनाचे सोन्याचे दागिने हिसकावून पळ काढला. या घटनेनंतर पीडित महिलेने नगर तालुका पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दिली.

पोलिसांनी या प्रकरणी मारहाण आणि चोरीचा गुन्हा दाखल केला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार लाड पुढील तपास करत आहेत.



## सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी अहिल्यानगर शहरात मौन कॅण्डल मार्च

विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी शांततामय व लोकशाही मार्गाने आंदोलन करणारे सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी तसेच केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, या मागणीसाठी अहिल्यानगरात १७ जुलै रोजी मौन कॅण्डल मार्च काढण्यात आला. याचे प्रारंभ वाडियापार्क येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन करण्यात आले. या मार्चमध्ये युवक–युवतींसह सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

# नगर शहरात फिरणाऱ्या तडीपार गुन्हेगाराला पोलिसांनी पकडले

नगर – शहरातून दोन वर्षांसाठी हद्दपार (तडीपार) करण्यात आलेला सराईत गुन्हेगार जिल्हा प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून शहरात फिरत असताना कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने त्याला पकडले आहे. बिरज्या ऊर्फ बिरजू राजू जाधव (रा. मकासरे चाळ, कोठी रोड) असे या आरोपीचे नाव आहे.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पथक १७ जुलै रोजी रात्री सव्वादहा वाजेच्या सुमारास क्लेरा ब्रुस हायस्कूल ग्राउंड परिसरात 'ब्लॅक स्पॉट पेट्रोलिंग' करत होते. यावेळी हायस्कूलच्या भिंतीच्या आडोशाला अंधारात एक संशयित इसम लपून बसलेला पोलिसांना आढळला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन नाव विचारले असता, त्याने आपले नाव बिरज्या ऊर्फ बिरजू राजू जाधव (रा. मकासरे चाळ, कोठी रोड) असे सांगितले.

पोलीस दप्तरी तपासून पाहिले असता, उपविभागीय दंडाधिकारी यांच्या आदेशान्वये त्याला १० जानेवारी २०२६ पासून दोन वर्षांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. कोणतीही कायदेशीर परवानगी नसताना शहरात बेकायदेशीरपणे प्रवेश केल्यामुळे पोलिसांनी त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १२२ व १४२ अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# भिमजीभाई पटेल यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील महाराष्ट्र सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष, पटेल हायस्कूलचे संस्थापक, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष व श्रीरामपूर न.प.पाणीपुरवठा समितीचे माजी सभापती व माजी नगरसेवक भिमजीभाई प्रेमजीभाई पटेल (वय ८१) यांचे १७ जुलै रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गायत्री साँ मिलचे मालक कांतीलाल, शांतीलाल व वसंतभाई पटेल यांचे वडील, प्रितेश, मितेश, यश व निशित पटेल यांचे आजोबा होत.

# माळीवाडा येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ७ जणांना अटक, ४ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर – शहरातील माळीवाडा भागातील भाग्यश्री लॉंज जवळील एका घराच्या टेरेसवर सुरू असलेल्या मोठ्या जुगार अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी १७ जुलै रोजी मध्यरात्री छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी ७ जुगाऱ्यांना अटक केली असून त्यांच्याकडून कार, मोबाईल आणि रोकड असा एकूण ४ लाख २६ हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना १७ जुलै रोजी रात्री गुप्त बातमीदारामार्फत या जुगार अड्ड्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख आणि गुन्हे शोध पथकाने पंचांसह रात्री १२.४५ वाजेच्या सुमारास टेरेसवर छापा टाकला. पोलिसांनी घटनास्थळावरून अजय दत्तात्रय बहिरवाडे, सागर सुरेश केवटे, गणेश शंकर आहिरे, नंदू शिवाजी म्हाडुळे, भारत सुदाम पवार, पप्पू ब्रिजलाल निसाद आणि संदीप बाळू बारसे यांना तिरट नावाचा हार–जितीचा जुगार खेळताना रंगेहात पकडले. आरोपींच्या झडतीत मिळून आलेली रोकड, ६ मोबाईल फोन, तिरट जुगाराचे साहित्य आणि जुगाराच्या ठिकाणी असलेली ४ लाख रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी ब्रेझा कार (क्र. एमएच १६ डीएस३५१६) पोलिसांनी जप्त केली आहे. आरोपींवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बांधकाम साईटवरून इलेक्ट्रीक साहित्याची चोरी

नगर – नगरमधील कल्याण रोडवर असलेल्या कवडे मळा येथील एका हॉस्पिटलच्या बांधकाम साईटवरून अज्ञात चोरट्याने ४४ हजार रुपये किमतीचे इलेक्ट्रीक साहित्य चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नयन रमेश पिंपळे (वय २९.रा. गोकुळ नगर, पाईपलाईन रोड, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांनी डॉ. दत्तात्रय अंधुरे यांच्या हॉस्पिटलच्या बांधकामाचे आणि वायरिंगचे काम घेतले आहे. १६ जुलैच्या सायंकाळी काम आटोपून वायरमन घरी गेल्यानंतर, दुसऱ्या दिवशी १७ जुलै रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास ही चोरी उघडकीस आली. बांधकाम साईटवरून पोलीकॅब कंपनीचे एकूण १६ हजार रुपये किमतीचे १० वायर बंडल, २३ हजार रुपये किमतीचा कॅमेऱ्याचा वायर बंडल व वायरिंग केलेली वायर, आणि ५ हजार रुपये किमतीचे ग्रायंडर व कटर मशीन असे साहित्य चोरीला गेले आहे.

याप्रकरणी नयन पिंपळे यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून महिला पो.कॉ. संगीता बडे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# अनिल पांडे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील सोमाणी हॉस्पिटल शेजारील श्री चिंतामणी ट्रेडर्सचे मालक अनिल नेमीचंद पांडे (भारमवाला) (वय ६८) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सुन, पुतणे, जावई, नातवंडे, असा परिवार आहे. नंदलाल पांडे यांचे थोरले बंधू, ऋषिकेश पांडे यांचे वडील, थत्ते मैदान जवळील चिंतामणी ट्रेडर्सचे मालक विशाल व राहुल पांडे यांचे चुलते होत.

# सख्ख्या भावाच्या घरात दागिन्यांची चोरी करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

## आरोपीवर दाखल आहेत तब्बल २३ गंभीर प्रकारचे गुन्हे, एमआयडीसी पोलीसांची कारवाई

नगर – अहिल्यानगर येथील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सख्ख्या भावाच्या घरातच दागिन्यांची घरफोडी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी अत्यंत शिताफीने अटक केली आहे. अटक करण्यात आलेला आरोपी गणेश विठ्ठल आव्हाड (वय २६, रा. साईराजनगर, नवनागापूर, सध्या रा. गांधीनगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर) हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यांमध्ये जबरी चोरी, घरफोडी आणि बलात्कारासारखे तब्बल २३ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

नवनागापूर येथील साईराजनगर येथे राहणारे हॉटेल व्यावसायिक रमेश विठ्ठल आव्हाड (वय २४) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात घरफोडीची तक्रार दिली होती. रमेश आव्हाड हे २८ मे ते ५ जून २०२६ या कालावधीत बाहेर गेलेले असताना, अज्ञात चोरट्याने त्यांच्या राहत्या घरातून २ लाख ९६ हजार रुपये किमतीचे सोन्या–चांदीचे दागिने चोरून नेले होते. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ व ३३४ (१) अन्वये गुन्हा दाखल केला होता.



सख्ख्या भावाच्या घरात दागिन्यांची चोरी करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद केल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलीसांचे पथक.

या गुन्ह्याचा तपास करत असताना स.पो.नि. हेमंत थोरात यांना हा गुन्हा फिर्यादीचा सख्खा भाऊ गणेश आव्हाड यानेच केला असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर स.पो.नि. थोरात यांच्या सूचनेवरून तपास पथकाने तात्काळ गांधीनगर, बोल्हेगाव परिसरात छापा टाकून संशयित गणेश आव्हाड याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या चौकशीत त्याने आपल्याच भावाच्या घरात चोरी केल्याची कबुली दिली असून, पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

अटक करण्यात आलेला आरोपी गणेश आव्हाड हा अत्यंत अट्टल गुन्हेगार आहे. त्याच्यावर यापूर्वी एम.आय.डी.सी., तोफखाना, कोतवाली, श्रीरामपूर शहर, नेवासा आणि लोणी पोलीस ठाण्यात जबरी चोरी, घरफोडी, बलात्कार आणि अपहरण अशा विविध कलमांखाली २३ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई स.पो.नि. हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार राकेश खेडकर, पो.हे.कॉ. शैलेश रोहोकले, संदीप पवार, दादासाहेब नरोटे, देवीदास खेडकर, राजू सुद्रीक, पो.कॉ.दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### सेल्फ-मेडिकेशन: आरोग्याशी खेळणारा धोका

आजच्या धकाधकीच्या जीवनात छोट्या-मोठ्या आजारांवर डॉक्टरांकडे जाण्याऐवजी स्वतःच डॉक्टर बनून औषधे घेण्याचे प्रमाण वाढले आहे. ही 'सेल्फ-मेडिकेशन'ची प्रवृत्ती अत्यंत घातक आहे. प्रत्येक व्यक्तीची प्रकृती वेगळी असते, त्यामुळे इतरांच्या सल्ल्याने किंवा इंटरनेटवरील माहितीवर विसंबून औषधे घेतल्याने आजाराचे मूळ वाढत राहते. अशा स्वमनाने घेतलेल्या औषधांमुळे किडनी आणि यकृतावर गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात, तसेच प्रतिजैविकांच्या अयोग्य वापरामुळे शरीरातील जंतू औषधांना दाद देईनासे होतात. तात्पुरत्या आरामासाठी आपण आरोग्याशी मोठी तडजोड करतो, ज्यामुळे गंभीर आजारांचे निदान लांबणीवर पडते. औषधांचा डोस आणि कालावधी फक्त तज्ज्ञ डॉक्टरच निश्चित करू शकतात, त्यामुळे औषधोपचारात शॉर्टकट घेणे महागात पडू शकते. अनेकदा आपण सुरुवातीला होणाऱ्या शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करतो आणि केवळ वेदनाशामक गोळ्या (पेनकिलर) घेऊन त्या दाबून टाकतो. यामुळे जेव्हा आपण खरोखर डॉक्टरांकडे जातो, तेव्हा तो आजार बळावलेला असतो आणि उपचार करणे अधिक क्लिष्ट तसेच खर्चिक बनते. केवळ काही रुपयांच्या गोळ्या वाचवण्याच्या नादात आपण भविष्यात आपल्या शरीराचे मोठे नुकसान करून बसतो, ही गोष्ट आपण गांभीर्याने समजून घेतली पाहिजे. समाजात प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे सहज उपलब्ध होतात, हा गैरफायदा घेणे टाळले पाहिजे. एखादे औषध दुसऱ्याला गुणकारी ठरले म्हणजे ते आपल्यासाठीही सुरक्षित असेलच, असे मानणे हा सर्वात मोठा गैरसमज आहे. त्यामुळे कोणतीही औषध घेण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला घेणे ही केवळ गरज नसून ती एक सुरक्षित जीवनशैली आहे. आपल्या आणि आपल्या प्रियजनांच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी हा संयम पाळणे अनिवार्य आहे. शेवटी, 'अर्धवट माहिती आरोग्यासाठी घातक असते', हे लक्षात ठेवावे व तज्ज्ञांवरच विश्वास असावा.

## पाककला

### पाव पॅटिस

**साहित्य :** पाव ४, बटाटा ३ मध्यम उकडलेले, कांदा १ बारीक चिरलेला, टोमॅटो १ बारीक चिरलेला, मटार १/२ कप उकडलेले, बारीक चिरलेली कोबी १/२ कप, आलं-लसूण पेस्ट १ चमचा, पावभाजी मसाला २ चमचे, लाल तिखट १/२ चमचा, चाट मसाला १/२ चमचा, मीठ चवीनुसार, बटर ४ चमचे, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, लिंबाचा रस १ चमचा

**कृती :** उकडलेले बटाटे चांगले कुस्करून घ्या. त्यात उकडलेले मटार, बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो आणि कोबी घाला. त्यात आलं-लसूण पेस्ट, पावभाजी मसाला, लाल तिखट, चाट मसाला, मीठ आणि कोथिंबीर घालून सर्व मिश्रण एकजीव करा. लिंबाचा रस पिळून पुन्हा एकदा मिक्स करा. पॅटिसचे मिश्रण तयार आहे. पाव मधून उभे दोन भाग करा. तव्यावर थोडे बटर घालून पावच्या दोन्ही बाजू खरपूस भाजून घ्या. भाजलेल्या पावमध्ये तयार पॅटिसचे मिश्रण भरपूर भरून दाबा. वरून थोडे बटर आणि बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर पेरून सर्व्ह करा. टोमॅटो केचप आणि हिरव्या चटणीसोबत गरमागरम पाव पॅटिस खायला द्या.

## वास्तू

### प्राण्यांची जागा

* घराच्या मुख्य दरवाजाच्या अगदी समोर आरसा लावणे टाळावे. आरसा सकारात्मक ऊर्जा परावर्तित करून बाहेर फेकतो, समृद्धी जाते.

* जेवणाचे टेबल नेहमी आयताकृती किंवा चौकोनी असावे. गोल आकाराचे टेबल वास्तूमध्ये टाळावे, कारण ते एकतेसाठी फारसे पूरक मानले जात नाही. जर घरात पाळीव प्राणी असतील, तर त्यांना उत्तरेकडे किंवा वायव्य कोपऱ्यात जागा द्यावी.

## सौंदर्य

* सुक्या त्वचेसाठी दुधात थोडा मध मिसळून त्याने चेहऱ्याला हलकी मालिश करा आणि १० मिनिटांनी चेहरा स्वच्छ धुवा. त्वचा मऊ आणि चमकदार होईल.

## सल्ला

जेव्हा तुम्ही गुळाचा पाक मोजण्यासाठी चमचा वापरता, तेव्हा तो चिकटतो. यावर उपाय म्हणजे, चमचा मधात टाकण्यापूर्वी त्याला थोडेसे तेल लावा. यामुळे मध चमच्याला न चिकटता सहज खाली पडतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

## दैनिक पंचांग

रविवार, दि. १९ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, उत्तरा १८।१२, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. १० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामातील प्रलंबित कामे मार्गी लागतील.

**वृषभ :** प्रवासाचे बेत यशस्वी होतील. धनप्राप्तीचे मार्ग सुलभ होतील.

**मिथुन :** जुन्या मित्रांची भेट झाल्यामुळे मन आनंदी राहील.

**कर्क :** मनातील इच्छा पूर्ण होण्याचा काळ आहे. व्यापारात नफा होईल.

**सिंह :** कार्यामध्ये यश संपादन कराल. नवीन ओळख होईल.

**कन्या :** आर्थिक आवक वाढेल. गुंतवणुकीतून चांगला परतावा मिळेल.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी नवीन जबाबदारी सोपवली जाईल.

**वृश्चिक :** कामातील सर्व अडथळे दूर होतील. पदोन्नतीच होईल.

**धनु :** प्रगतीसाठी नवीन संधी उपलब्ध होतील. व्यवसायात मोठे यश मिळेल.

**मकर :** कष्टाचे फळ मिळेल. आर्थिक स्थिती बळकट होईल.

**कुंभ :** मनात असलेले सर्व बेत पूर्ण होतील. धनलाभाचे स्पष्ट संकेत.

**मीन :** जुनी येणी प्राप्त होतील. हाती घेतलेल्या नवीन कामात यश मिळेल.

## शब्दगंध क्र. ७४७६ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | | ५ |
| | ■ | ६ | | ७ | | ■ | |
| ८ | ९ | | ■ | १० | | ११ | |
| १२ | | | | ■ | ■ | | ■ |
| ■ | | ■ | ■ | १३ | ■ | ■ | १४ |
| १५ | | १६ | ■ | १७ | १८ | | |
| | ■ | १९ | | | | ■ | |
| २० | | | ■ | | ■ | २१ | |

**आडवे शब्द :-** १) शिर्डीचे संत ४) शोध; पत्ता; ठावठिकाणा ६) खूप; पुष्कळ ८) जेवढा १०) समृद्धी; सुबत्ता; सुकाळ १२) दयाळू; कृपाळू १५) दाणे ज्यात भरतात तो पिकाचा भाग; भुट्टा १७) धंदा; उद्योग; उत्पन्नाचे साधन १९) कारकीर्द २०) पायऱ्या असलेली विहीर २१) तस्कर; चोरी करणारा

**उभे शब्द :-** १) समाजाविषयी २) बारकाई; चौकसपणा ३) उद्यान; उपवन; बगीचा ४) मुलगा (स्वतःचा); पुत्र; नंदन ५) मिळून; बरोबर; सहवर्तमान धरून ७) लहान मुलांचे एक कर्णभूषण ९) स्त्रियांचा एक दागिना ११) एक त्वचारोग (विशेषतः कुत्र्याला होणारा) १३) जलाशय, तळे (विशेषतः नैसर्गिक) १४) लढाऊ जहाजांचा तांडा; नौदल १५) ज्वारी वगैरे पिकाचे वाळलेले ताट जे जनावरांचे अन्न असते १६) सवय; अभ्यास १८) गुंतागुंत झालेले डोक्यावरचे केस

### शब्दगंध क्र. ७४७५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | न | स | ब | द्वा | र | ■ | भा |
| च | वा | ळ | ■ | द | ण | क | ट |
| म | ग | ■ | भा | ला | ■ | हा | ■ |
| च | त | को | र | ■ | क | णी | स |
| ■ | ■ | पा | त | क | ■ | ■ | व |
| स | व | य | ■ | ला | ग | व | ड |
| व | ■ | मा | ज | का | ■ | र | ■ |
| त | प | न | ■ | र | वि | वा | र |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** शब्दांना धारदार बनवण्यापेक्षा विचारांना प्रगल्भ बनवा, कारण शब्दांनी वाद होतो आणि विचारांनी विकास होतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### साबणाचे बुडबुडे गोलच का? चौकोनी किंवा इतर आकारात का नसतात?

साबणाचे बुडबुडे उडवायला लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच आवडतात. पण कधी विचार केला आहे का की फ्रेम चौकोनी असली तरी बुडबुडा मात्र नेहमी गोलच का होतो? यामागे खूप मजेदार विज्ञान दडले आहे.सर्वात महत्वाचे कारण म्हणजे पृष्ठताण. पाण्याच्या पृष्ठभागावर एक अदृश्य रबरासारखा ताण असतो. हा ताण नेहमी पाण्याचा पृष्ठभाग लहान करायचा प्रयत्न करतो. साबण पाण्यात मिसळल्यावर हा पृष्ठताण कमी होतो आणि पाण्याचा पातळ थर जास्त वेळ टिकू शकतो. त्यामुळेच आपल्याला मोठे बुडबुडे बघायला मिळतात. बुडबुड्याच्या आत हवा भरलेली असते. ही हवा सगळ्या बाजूंनी सारख्याच ताकदीने साबणाच्या थराला ढकलते. आता विचार करा, एका विशिष्ट आकारात सगळ्यात कमी पृष्ठभाग कोणाचा असतो? तो म्हणजे गोल. म्हणूनच पृष्ठताण आणि हवेचा दाब मिळून बुडबुड्याला आपोआप गोल आकार देतात. निसर्गाला नेहमी कमीत कमी मेहनतीत जास्तीत जास्त काम करायचे असते आणि गोल हाच त्याचा आवडता आकार आहे. यामुळेच पृथ्वी, सूर्य, संत्र, फुगा हे सगळे देखील जवळजवळ गोलच असतात. कारण गोल आकारात दाब सर्वत्र सारखा पडतो आणि वस्तू मजबूत राहते. म्हणूनच निसर्गाने बुडबुड्यासाठी देखील हाच आकार निवडला आहे. थोडक्यात, साबणाचे बुडबुडे गोल असण्याचे कारण म्हणजे पृष्ठताण आणि हवेचा दाब. हे दोघे मिळून पाण्याच्या थराला सर्वात लहान आणि मजबूत आकार देतात आणि तो आकार म्हणजे गोल.

एका ताटात साबणाचे पाणी घ्या आणि त्यात चौकोनी किंवा त्रिकोणी तार बुडवा. बाहेर काढल्यावर बघा, फ्रेमचा आकार काहीही असला तरी बुडबुडा मात्र गोलच तयार होईल!

### फुलाची शिकवण

एका खूप सुंदर बागेत गुलाबाची आणि मोगऱ्याची अनेक फुले उमलली होती. तिथेच एका कोपऱ्यात एक छोटेसे, साधे फूलही होते. बागेत रोज अनेक लोक फिरायला येत असत. काही लोक फुलांचा सुगंध घेत, काही फुले तोडून घरी नेत, तर काही लोक चालताना नकळत फुलांना तुडवत पुढे जात. एके दिवशी, एका कळीने उमललेल्या फ ुलाला विचारले, आपण किती सुंदर आहोत, आपण बागेची शोभा वाढवतो.

तरीही काही लोक आपल्याला तोडून टाकतात, तर काही लोक आपल्याला पायाखाली तुडवतात. तरीही, आपण त्यांना आपला सुगंध का देतो? आपल्याला त्रास होतो ना? फुलाने हसून उत्तर दिले, प्रिय मित्रा, आपला स्वभाव सुगंध देणे हा आहे.

आपण कोणाला सुख देतोय किंवा कोण आपल्याला त्रास देतंय, याचा विचार करून आपण सुगंध देणे थांबवू शकत नाही. आपण कोणाला देतोय यापेक्षा आपण 'काय' देतोय, हे महत्त्वाचे आहे. जे लोक आपल्याला तोडतात किंवा तुडवतात, त्यांनाही आपल्या सुगंधाची गरज असतेच. कळीला ते समजले आणि तिनेही स्वतःचा सुगंध पसरवण्याचा निश्चय केला.

तात्पर्य : आपला स्वभाव चांगला ठेवणे हे आपल्या हातात असते. समोरची व्यक्ती आपल्याशी कशी वागते, यावर आपला स्वभाव अवलंबून नसावा. निस्वार्थपणे प्रेम आणि आनंद वाटणे हेच खऱ्या मोठेपणाचे लक्षण आहे.

## आत्मशक्ति



### बंधूप्रेम

अध्यात्म मंडळांच्या प्रवासात सद्भाग्याने सर्व रस्ते सजवले गेले. ते जेथे जेथे गेले तेथे त्यांना केवळ बहारच (खुललेले सृष्टी सौंदर्य) पहावयास मिळाली.

प्रभूप्रेमात मग्न झाल्यावर कसे वाटते? कल्पना करा.... तुम्ही आपल्या प्रियतमाबरोबर बागेत गप्पा मारीत आहात! पाण्याचे कारंजे उडत आहेत आणि असंख्य फुलांच्या मंद मंद सुगंधामध्ये आपण धुंद झाला आहात. अशा अत्यंत मनोहर दृश्यापेक्षाही प्रभू प्रेमाचे दृश्य कितीतरी अधिक मनोहर असते. पर्वतावर संध्या समयी अस्तास जाणाऱ्या सूर्याचे रंगसौंदर्य मोहून टाकते. त्याहून अधिक प्रभूप्रेमाचे सौंदर्य मोहित करते. कोणा एका जंगलात बसला आहात, शेजारी स्वच्छ निर्मळ झरा वाहतो आहे, सारे काही शांत वाटते, त्या शांततेपेक्षाही प्रभूप्रेमाची शांतता अधिक असते. अतिशय उत्तम विणा किंवा व्हायोलिनच्या मधुर मधुरसंगीतापेक्षा प्रभुप्रेम अधिक आनंद देते.

तेव्हा असे वाटते जणू परमेश्वराचे प्रेम अगदी अपादमस्तक (मस्तकापासून पायांपर्यंत) झरझरत आहे. आत्मा सर्वांवर निःस्वार्थ प्रेम करतो.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### ध्यान आणि चिंतन

आपण देण्याचे पाच मार्ग बघितले. दान देणं, प्रतिभा, कौशल्यं आणि ज्ञान वाटणं आणि कृतज्ञता व्यक्त करणं. आणखी एक मार्ग, जो देण्याचा सर्वांत उच्च मार्ग आहे. तो म्हणजे आपल्या आध्यात्मिक स्पंदनांद्वारे इतरांची सेवा करणं. आपलं अस्तित्व आपल्या आजूबाजूच्या प्रत्येकाला तरंग पाठवत असतं. त्यासाठी आपल्याला काहीच करावं लागत नाही - आपण जसे आहोत, तसे आपोआप प्रत्येकापर्यंत पोहोचतो.

ध्यान आणि चिंतन

मला स्वतःला बघायचं आहे... मी आणि - एक आत्मा - सुंदर, मौलिक, शुद्ध आहे... आज संपूर्ण दिवस ज्या वस्तू मी वापरेन आणि ज्या लोकांना भेटेन त्यांच्या प्रति मी आधी कृतज्ञता व्यक्त करेन... आत्मा, निसर्ग आणि निर्जीव वस्तू यांबरोबर होणाऱ्या प्रत्येक संवादामध्ये हा शुद्ध आणि शक्तिशाली विचार आहे... सगळ्यांना देणं, सगळ्यांचे आभार मानणं... भेटणाऱ्या प्रत्येकाला सहकार्य करणं... माझ्याकडे असलेली माहिती देणं... त्यांना पुढे जाण्यास मदत करणं... त्यांना सशक्त बनवणं... आपल्या विचारांची आणि स्पंदनांची काळजी घेणं... कारण ते माझ्या आजूबाजूच्या लोकांवर आणि निसर्गावर परिणाम करतात... मी आपोआपच सगळ्यांना देत आहे... निःस्वार्थपणे... मी एका दात्याचं मूल आहे, देवांचा वंशज आहे... मी अखंड देत राहतो.... ओम शांती!

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

चिंटू : बाबा, आपण श्रीमंत कधी होणार?

बाबा : बघ बाळा, जोपर्यंत तुझी आई मॉलमध्ये गेल्यावर वस्तूची किंमत न बघता 'हे नको, दुसरं दाखवा' म्हणत नाही, तोपर्यंत आपण मध्यमवर्गीयच आहोत!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्रसंघाचे सध्याचे सरचिटणीस कोण आहेत?

– अँटोनियो गुटेरेस

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'रिकामं घर...'

अपघातानं माझे वडिल गेले आणि ते राहात होते ते घर रिकामं झालं. कधी माझ्याकडे कधी भावाकडे आई राहु लागली. माझ्याकडे असतांना जीना चढुन वरच्या रुममध्ये जाणं तिला त्रासदायक होऊ लागलं. आई आणि वडिलांची इच्छा होती की मी आणि भावाने एकाच कॉलनीत घर घेऊन राहावं. चारही खोल्या (टु बी एच के ) खाली असलेली वास्तु मिळाली, भाऊ राहात असलेल्या कॉलनीत. लगेचच खरेदी करुन राहायला आलो. आता सावतानगरमधील माझं घर रिकामं झालं. सावतानगरमध्ये दहा वर्षे राहिलो. माळीगल्लीतील घरात आम्ही अठरा वर्षे राहिलो. दोन्हीही घरं रिकामी झाली. सावतानगरचं घर विकायचं म्हणून अनेकांना सांगितलं. एकदा निवांत वेळ काढुन सावतानगरच्या घरी गेलो. घरापुढील रिकाम्या जागेत धुळ, कचरा साठलेला. कुलुप उघडुन घरात आलो. घर अस्वच्छ दिसत होतं. दरवाजे, खिडक्या उघडल्या. पुस्तकांसाठी काचेचं शोकेस होतं तिथं जाऊन बसलो. मन व्यक्त होऊ लागलं– 'चारशेपेक्षा अधिक पुस्तकं इथं होती. खरंच पुस्तकांसोबतची मैत्री, आपलयाला चांगल्या अर्थाने घडवते, सुसंस्कारित करते, अक्षरांचा फॉन्ट छोटा की मोठा महत्वाचा नसतो. ते पुस्तक वाचल्यामुळं मला नेमकं काय मिळालं हे फार महत्वाचं आहे. अनेक पुस्तकं तिथं बसुन वाचल्याचं आठवु लागलं. चार, सहा महिन्यांनी पुस्तकं, शोकेसमधुन काढायची, कपड्याने स्वच्छ करुन ठेवायची. सारं काही नजरेसमोर दिसु लागलं. लहान टेबल, टेबलावर असलेल्या वस्तु दिसु लागल्या. त्या लहान टेबलाच्यावर असणारी मिळालेली सन्मानचिन्हं नजरेसमोर दिसु लागली. त्या घरात राहात असतांना कोणकोणती सन्मान चिन्हं मिळाली त्याचाही विचार मन करु लागलं. खुर्च्या, सोफा होता, त्या जागेवर बसलो. तिथल्या भिंतीला हात लावला तो मायेचा, मम त्वाचा भिंतीचा स्पर्श दहा वर्षांच्या वास्तव्याची आठवण करुन देऊ लागला.

किचनमध्ये आलो. किचन ओट्याला स्पर्श केला, मनोमन नमस्कारही केला. किचन शेजारीच असलेलं देवघर देवघराशेजारिल भिंतीवर असणारे स्टिलचे डबे, डब्यांच्यावर असणारी लाप्टी. लाप्टीवर ठेवलेल्या वस्तु काय – काय होत्या हे आठवण्याचा प्रयत्न केला. हॉलमधील टीव्हीची जागा पाहिली. जीन्याच्या पायऱ्या चढुन वर बेडरुममध्ये आलो. तेथील खिडकीतुन दिसणारी शेती, पिकं, झाडं आणि दूरवर दिसणारा मिरावली पहाड. त्या खिडकीजवळ बसुन पाहिलेला पाऊस आठवला. बाल्कनीत आलो. पक्ष्यांना पाणी ठेवलेलं भांडं, धान्य. मोकळ्या जागेत नातवाचं खेळणं हे सुध्दा दिसु लागलं. घर माणसांनी भरलेलं असलं की त्या घरातलं जीवंतपण प्रकर्षाने जाणवतं. गृहलक्ष्मीचा हस्तस्पर्श, राहात असतांना संपूर्ण घराला ममत्वाची ऊर्जा देत असतं. पायऱ्या उतरुन खाली हॉलमध्ये आलो तेव्हा ते रिकामं घर पाहुशी वाटत नव्हतं. त्या घराचा जीवंतपणा नाहिसा झालेला. धुळ, कचरा पाहुन आसवं गालांवर केव्हा आली हेसुध्दा कळलं नाही. दहा वर्षांच्या ह्या वास्तुमधल्या वास्तव्याचे क्षण नजरेसमोर फेर धरु लागले. रिकामंघर आणि भांडी, पुस्तकं आणि माणसांनी भरलेलं घर ह्यातला फरक प्रकर्षाने जाणवु लागला. खरं तर ह्याक्षणी त्या रिकाम्या घरालाही काहीतरी वाटत असेलचना ? हा प्रश्नही मनात आला. माझं मन म्हणालं घरालासुध्दा माणसांची ओढ असतेच अन्यथा ते फक्त चार भिंती आणि छत ह्या पुरतंच मर्यादित राहात. आम्ही दहा वर्षे ह्या वास्तुत कसे राहिलो, आमच्या सुख-दुःखाची ही वास्तु साक्षीदार आहे. ह्या वास्तुने ऊन, वारा, पाऊस, थंडी ह्यापासून आमचं संरक्षण केलं आणि एवढं भरभरून आनंद, प्रेम दिलं आहे की त्याची परतफेड आम्ही कधीच करु शकणार नाही.

निर्जीव भिंतीसुध्दा माणसांच्या स्पर्शासाठी आसुसलेल्या असतात. माणसांनी वास्तुच्या अंगा-खांद्यावर खेळावं हे त्या वास्तुला मनापासून वाटत असतं. आत्ता ह्याक्षणी हे रिकामं घर माणसांच्या स्पर्शाशिवाय अनाथ झालं आहे. ह्या घराशेजारी दोन घरं आहेत पण आता ही वास्तु अनाथ आहे. माझं वाचन, लेखन, टीव्ही पाहाणं, मित्र-परिचित – नातेवाईक ह्यांचं, ह्या घरातलं येणं-जाणं मी ह्या घरात नसल्यामुळे बंद झालं आणि हे घर स्वतःचं अस्तित्वच हरवुन बसलं. रिकाम्या घरातली ही शांतता त्या घरालाही आता नकोशी झाली आहे. ह्या वास्तुला गृहलक्ष्मीच्या, कर्त्यापुरुषाच्या स्पर्शाची आज प्रचंड आवश्यकता आहे. वाळु, विटा, सिमेंटने भरलेली ही वास्तु मी असेपर्यंत मायेनंसुध्दा भरलेली होती. आता फक्त वाळु, विटा, सिमेंट आहे.'– मनाचं हे असं व्यक्त होणं हे मनाचं नव्हतंच. त्या वास्तुचं ते मन मोकळं करणं होतं. जड पावलांनी मी बाहेर आलो. दरवाजाला कुलुप लावलं पण घराला असं कोंडुन घेणं चांगलं नाही हे माझ्या मनाने सांगितलं. रिकामं घर बरचसं सांगण्याचा प्रयत्न करत असतं आपण समजुन घ्यायलाच पाहिजे.

(लेख क्र.६१०)

**– सुनील राऊत**

माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर

मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### लसूण

६) लसणाच्या पाकळ्या पाच-सहा, सैंधव पाव चमचा व तुपामध्ये भाजलेला हिंग पाव चमचा यामध्ये आल्याचा रस दोन चमचे घालून हे सर्व मिश्रण एकत्र करावे. या औषधाचे सेवन केल्यास शरीरातील चरबीचे प्रमाण कमी होऊन वजन आटोक्यात राहते. तसेच मलावष्टंभाची तक्रार असणाऱ्या रुग्णांचे पोटसुद्धा साफ होते. त्याच प्रमाणे, आपण ज्यांना ज्यांना भेटतो त्या सगळ्यांचे आपण आभार मानायला हवेत. आपल्या आयुष्यात कोणी आव्हानं उभी करत असेल तर आपल्या आंतरिक प्रगतीसाठी आणि आपली आंतरिक शक्ती वाढवण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या त्या व्यक्तीचे आपण आभार मानले पाहिजेत. **(क्रमशः)**


**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची

## वारी पंढरपुरची. संत दामाजी पंत

वारकरी संप्रदायाचा इतिहास हा केवळ मंदिरांमध्ये बसून टाळ-मृदंग वाजवणाऱ्या संतांचा इतिहास नाही, तर समाज संकटात असताना स्वतःचे सर्वस्व पणाला लावून मानवतेची सेवा करणाऱ्या क्रांतीकारी भक्तांचा इतिहास आहे. 'भक्ती' जेव्हा 'भूकेल्यांच्या सेवेत' रूपांतरित होते, तेव्हा ती कशी अलौकिक ठरते, याचं सर्वात ज्वलंत आणि सर्वश्रेष्ठ उदाहरण म्हणजे 'संत दमाजीपंत'!



सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा ही या थोर संताची कर्मभूमी. बहामणी राजवटीत विजापूरच्या दरबारी सरकारी अधिकारी असणाऱ्या दमाजीपंतांनी एका भीषण दुष्काळात राजाचा सरकारी धान्याचा कोठार भुकेल्या जनतेसाठी खुला केला. या एकाच कृत्याने त्यांनी इतिहास बदलला आणि जेव्हा राजाने त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली, तेव्हा त्यांच्या पाठीशी साक्षात पंढरीचा विठ्ठल 'विठू महार' बनून उभा राहिला.

संत दमाजीपंत यांचा जन्म चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात (अंदाजे १३८० च्या सुमारास) सोलापूर जवळील मंगळवेढा येथे एका सुसंस्कृत ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे घराणे धार्मिक आणि सदाचारी होते. दमाजीपंत लहानपणापासूनच अतिशय प्रामाणिक, बुद्धिमान आणि दयाळू स्वभावाचे होते.

त्या काळात महाराष्ट्राच्या या भागावर विजापूरच्या बहामणी सुलतानाची सत्ता होती. दमाजीपंतांची बुद्धिमत्ता आणि हिशोबातील चोखपणा पाहून सुलतान बादशहाने त्यांची नेमणूक मंगळवेढा परगण्याचे 'राजकीय कोठीवाले' (महसूल आणि धान्य कोठाराचे मुख्य अधिकारी) म्हणून केली. मंगळवेढा हे त्या काळी विजापूर राज्याचे मुख्य धान्य साठवणुकीचे केंद्र होते. दमाजीपंत विजापूरच्या राजाचे एक विश्वासू अधिकारी म्हणून काम पाहत होते, पण त्यांचे मन नेहमी पंढरीच्या विठ्ठलाच्या चरणी जडलेले असायचे. त्यांचा विवाह 'लक्ष्मीबाई' यांच्याशी झाला होता. प्रपंच आणि राजकाज सांभाळत असतानाच दमाजीपंत रोज गरिबांना अन्नदान करत आणि हरिनाम गजर करत असत.

इसवी सन १३९६ ते १४०८ या काळात महाराष्ट्रात एक अत्यंत भयानक आणि विनाशकारी दुष्काळ पडला, जो इतिहासात 'दुर्गादेवीचा दुष्काळ' म्हणून ओळखला जातो. तब्बल १२ वर्षे पाऊस पडला नाही. नद्या, विहिरी कोरड्या पडल्या, शेती नष्ट झाली आणि संपूर्ण जनजीवन उद्ध्वस्त झाले.

माणसे आणि जनावरे अन्नान्न करून मरू लागली. विजापूरच्या बादशहाचे धान्याचे कोठार मंगळवेढ्यात होते, जे कडक बंदोबस्तात होते. ते धान्य केवळ राजा आणि सैन्यासाठी राखीव होते. प्रजा मात्र भुकेने व्याकुळ होऊन दमाजीपंतांच्या दाराशी येऊ लागली. लहान मुलांचे रडणे, माता-भगिनींचे हाल पाहून दमाजीपंतांचे अंतःकरण हेलावले. त्यांनी विचार केला की, जर लोक डोळ्यांसमोर भुकेने मरत असतील, तर मी या सरकारी पदाचा आणि धान्याचा काय उपयोग? देव सर्व भूतांमध्ये (प्राण्यांमध्ये) वास करतो, मग देवाला भुकेले ठेवून मी राजाशी प्रामाणिक कसा राहू?

संत दमाजीपंतांच्या आयुष्यातील हा तो प्रसंग आहे, ज्याने त्यांचा इतिहास सुवर्णअक्षरांनी लिहिला गेला. हा प्रसंग भक्तीच्या आणि ईश्वरी चमत्काराच्या सर्वोच्च शिखराचे दर्शन घडवतो.

दमाजीपंतांनी विजापूरच्या सुलतानाची किंवा स्वतःच्या प्राणाचीही पर्वा न करता, मंगळवेढ्यातील सर्व सरकारी धान्याची कोठारे भुकेल्या जनतेसाठी खुली केली. त्यांनी दवंडी पिटवली की, ज्याला जितके धान्य हवे आहे, त्याने घेऊन जावे. हजारो लोक आले आणि त्यांनी आपले प्राण वाचवले. काही दिवसांतच कोठार रिकामे झाले.

मंगळवेढ्यातील काही दुष्ट आणि हेवा करणाऱ्या लोकांनी विजापूरच्या सुलतानाकडे चहाडी केली. त्यांनी बादशहाला पत्र लिहिले की, तुमचा अधिकारी दमाजीपंत याने बंड केले असून, राजाचे संपूर्ण धान्य मोफत वाटून सरकारी खजिना लुटला आहे.

सुलतानास हे कळाल्यानंतर तो प्रचंड संतापला. त्याने तातडीने सैनिकांना पाठवून दमाजीपंतांना बेड्या ठोकून विजापूरच्या दरबारात हजर करण्याचा आणि त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा देण्याचा हुकूम सोडला. सैनिक मंगळवेढ्यात आले. दमाजीपंतांनी हसत-मुखात ते स्वीकारले. त्यांनी सैनिकांना विनंती केली की, मला विजापूरला नेताना वाटेत पंढरपूर लागते, मला एकदा माझ्या विठ्ठलाचे दर्शन घेऊ द्या. सैनिकांनी ती विनंती मान्य केली.

दमाजीपंतांनी विठ्ठलाच्या चरणावर डोके ठेवले आणि म्हणाले, देवा, मी तुझ्या लेकरांचे प्राण वाचवले, आता जी तुझी इच्छा असेल ती होऊ दे.

दमाजीपंत विजापूरच्या वाटेवर असताना, पंढरपूरच्या विठ्ठलाला आपल्या परम भक्ताचे हे संकट सहन झाले नाही. विठ्ठलाने एका अत्यंत गरीब आणि सामान्य 'महार' (सेवक) बांधवाचे रूप घेतले. हातामध्ये एक काठी, डोक्यावर पागोटे आणि खांद्यावर एक गाठोडे घेऊन तो विठू महार विजापूरच्या दरबारात पोहोचला.

दरबारात जाऊन तो बादशहापुढे उभा राहिला आणि म्हणाला, हुजूर! मी मंगळवेढ्याच्या दमाजीपंतांचा सेवक आहे. माझे नाव 'विठू महार'. पंत स्वतः दरबारात येत आहेत, पण त्यांनी मला आधी पाठवले आहे. त्यांनी मंगळवेढ्यात जे धान्य लोकांना विकले, त्याचे हे पूर्ण पैसे (मोहरा) त्यांनी या गाठोड्यात पाठवले आहेत. कृपया हा हिशोब चुकता करा आणि दमाजीपंतांची पावती द्या.

सुलतानाने ते गाठोडे उघडायला सांगितले. गाठोडे उघडताच संपूर्ण दरबार अद्भूत प्रकाशाने उजळून निघाला. त्या गाठोड्यात साक्षात सुवर्णमोहरा (सोन्याची नाणी) चकाकत होत्या. बादशहाच्या खजिनदाराने जेव्हा त्या मोहरा मोजल्या, तेव्हा त्या धान्याच्या एकूण किमतीपेक्षा कित्येक पटीने जास्त भरल्या. खजिनदार म्हणाला, बादशहा सलामत, एवढा मोठा खजिना आपल्या आयुष्यात आपण कधी पाहिला नाही. बादशहा विठू महाराजांच्या त्या तेजस्वी रूपाकडे पाहतच राहिला. बादशहाने आनंदाने पावती लिहून दिली की, दमाजीपंतांचा सर्व हिशोब चुकता झाला आहे आणि आम्ही त्यांच्यावर अत्यंत खूश आहोत. विठू महार ती पावती घेऊन गायब झाला.

काही वेळाने दमाजीपंतांना घेऊन सैनिक विजापूरच्या दरबारात पोहोचले. दमाजीपंत अत्यंत शांतपणे मृत्यूदंडाची वाट पाहत उभे राहिले.

पण त्यांना पाहताच बादशहा सिंहासनावरून खाली उतरला आणि दमाजीपंतांच्या पाया पडला. बादशहा म्हणाला, पंत, तुम्ही धन्य आहात! तुमच्यासारखा प्रामाणिक अधिकारी माझ्या राज्यात नाही. तुमचा तो 'विठू महार' नावाचा सेवक एवढा खजिना देऊन गेला की आमचे सात पिढ्यांचे कल्याण झाले. हे पहा तुमची पावती!

दमाजीपंतांनी जेव्हा ती पावती पाहिली, तेव्हा त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. त्या पावतीवर साक्षात विठ्ठलाच्या हाताची सही होती. दमाजीपंतांना समजले की, माझ्यासाठी साक्षात जगन्निवास, पंढरीचा राणा विठ्ठल सुलतानाचा नोकर बनून दरबारात आला आणि त्याने मोहरा मोजल्या!

दमाजीपंतांनी बादशहाला सर्व सत्य सांगितले की, माझा कोणताही विठू महार नावाचा सेवक नाही, तो स्वतः देव होता. हे ऐकून बादशहाही थक्क झाला. बादशहाने दमाजीपंतांना खूप मोठी जहागिरी देऊ केली, परंतु दमाजीपंतांचे मन आता संसारातून आणि नोकरीतून पूर्णपणे उडाले होते. त्यांनी विचार केला, ज्या देवाच्या हाताला कधी सुदर्शन चक्र शोभते, त्या हाताने माझ्यासाठी सुलतानाचे पैसे मोजावे लागले? अशा नोकरीला आणि वैभवाला धिक्कार असो! त्यांनी तातडीने नोकरीचा राजीनामा दिला आणि ते पूर्णपणे विठ्ठल भक्तीत लीन झाले.

संत दमाजीपंत हे केवळ एक भक्त नव्हते, तर ते वारकरी संप्रदायातील थोर संत कवी होते. त्यांनी अनेक अभंगांची रचना केली आहे, ज्यात देवाविषयीची कृतज्ञता, मानवी जीवनाची क्षणभंगुरता आणि भूतदयेचे महत्त्व सांगितले आहे.

संत दमाजीपंतांनी आपले उर्वरित आयुष्य मंगळवेढ्यात विठ्ठल भक्ती आणि लोकसेवेमध्ये घालवले. इसवी सन १४१० च्या सुमारास त्यांनी मंगळवेढ्यातच समाधी घेतली. आज मंगळवेढा (सोलापूर) येथे संत दमाजीपंतांचे भव्य आणि ऐतिहासिक मंदिर आहे. या मंदिराच्या परिसरात आजही तो ऐतिहासिक धान्याचा कोठार आणि विठ्ठलाने जिथे विठू महार म्हणून दर्शन दिले, त्या स्मृती जतन केल्या आहेत. वारकरी संप्रदायात आषाढी आणि कार्तिकी वारीला जाणारे भाविक मंगळवेढ्याला जाऊन दमाजीपंतांच्या चरणी नतमस्तक झाल्याशिवाय त्यांची वारी पूर्ण मानत नाहीत. मंगळवेढ्याला 'संतांची भूमी' म्हटले जाते, ज्याचे मुख्य श्रेय दमाजीपंतांना जाते.

आजच्या स्वार्थी, भ्रष्टाचारी आणि भौतिकवादी युगात संत दमाजीपंत यांचे चरित्र प्रत्येक मानवाला एक मोठा आदर्श घालून देते:

### मानवता हाच खरा धर्म


आज जगात गरिबी आणि भूक वाढते आहे. दमाजीपंतांनी दाखवून दिले की, भूकेल्या माणसाला अन्न देणे हीच खरी ईश्वराची पूजा आहे.

### नियम आणि नैतिकतेची लढाई

जेव्हा नियम मानवाच्या विनाशाचे कारण बनतात, तेव्हा नैतिकतेसाठी नियमांचे उल्लंघन करणे हे पाप नाही, तर पुण्य आहे, हे दमाजींच्या धैर्यावरून समजते.

### अहंकाराचा त्याग

स्वतः एवढ्या मोठ्या पदावर असूनही त्यांनी कधीही गर्व केला नाही. ईश्वराच्या दर्शनानंतर त्यांनी क्षणात वैभवाचा त्याग केला. जेव्हा एखाद्या भक्ताला प्राणिमात्रांमधील विठ्ठल दिसू लागतो आणि तो लोककल्याणाचा 'निजध्यास' घेतो, तेव्हा देव स्वतः त्याचा नोकर बनून धावून येतो, हेच संत दमाजीपंत यांच्या दिव्य आणि अद्भूत चरित्राचे सार आहे.



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## त्यासी का म्हणावे माणूस?

असे म्हणतात, भगवंताला हजार हात. ते हवे ते लुटून देतात. किती घेशील रे माणसा, तू दोन हातात तो करणार. सुखाची बरसात। आपण भिजायचे त्याच्या कृपेच्या पावसात. स्वतःला कशाला लावायचे धंद्यात ? मेहनतीच्या फंदात ? पण काय हो, भगवंताला हजार हात हे म्हणण्यात कुणाचा हात ? असे माणसा, तूच दिलेस ना हे हजार हात भगवंताला ? पण एवढे बळ स्वतःच नको का वापरायला ? स्वतःचे प्रचंड बळ द्यायचे भगवंताला ? मग आपलेच बळ नि आपणच सोसत बसायची कळ ? भगवंता, इतरांना सुख वाटतोस, थोडा माझ्याकडेही वळ. पण खरे तर आपणच घालवावी आपली मरगळ आणि हजार हाताचे आपले आपणच वापरावे बळ. पण दुसऱ्याच्या छायेत जगणाऱ्याचे सगळे अमंगळ. अयममृतनिधानं नायकोप्यौषधीनां अमृतमयशरीरः कान्तियुक्तापि चन्द्रः । भवतिविगतराशीर्मण्डलं प्राप्य भानोः परसदननिविष्टः को लघुत्वं यति ।।




चंद्राजवळ प्रकाशाचे काय कमी बळ? त्यात अमृताने ठोकलाय त्याच्या दारी तळ. पण आता बसलाय निस्तेज होऊन. का? गेला सूर्याकडे. आपणच आपले सूर्याला पुढे म्हटले, दे रे बाबा आधार गेला. त्याने दिला. पसरली त्याच्या घरी पथारी. मग दुर्देवाने उभे दारी. क्षुद्रत्व प्राप्त झाले. मावधनाथ म्हणतात. आपुल्या अंगी आळस दुसऱ्या देई साहस मग लागे भिकेस यासी का म्हणावे माणूस ?

स्वतः काम करण्याची प्रवृत्ती नाही, आयते मिळवायला पाही. त्यासाठी आपली शक्ती दुसऱ्याला देई. तो कशाला तुमची काळजी घेई? तो स्वतः भरभराटीला जाई. मग लोक म्हणतील. हा काय माणूस ?


एक होता साधू. त्याच्या अंगी इच्छेला येईल ते करण्याचे सामर्थ्य. पण सगळे जाई व्यर्थ. मांजर दूध प्यायचे. कुत्रा येवून अन्नात तोंड घाली. कारण साधू सगळे उघडे टाकी. मग त्याने दारात उभा केला एक मातीचा वाघ. त्याच्या बुजगावण्याला भितील मांजर, कुत्रा, मग दूध आणि जेवण सुखरूप मिळेल मला. स्वतः अंथरुणावर लोळत बसला.

मांजर दोन दिवस भ्याली त्या मातीच्या निर्जीव वाघाला. कुत्राही घाबरला त्या प्राण्याला. साधू मग निश्चित झाला. पण हे सुख कुठे टिकले फार ? तिसऱ्या दिवशी मांजर व कुत्रा झाले हुशार. त्यांनी पाहिले, या वाघात नाही जीव. मग मांजर प्याले दूध. कुत्र्याने नासवला स्वयंपाक. साधूला आला राग. पण आळस नाहीच टाकला. त्याने त्या वाघात ओतला प्राण. केला त्याला जिवंत. आपले बळ वाघाला दिले. स्वतः मस्त आसन ठोकले. कुत्रा, मांजर आता मात्र खरेच भ्याले. वाघाच्या डरकाळीने तिकडे पुन्हा नाही फिरकले. लोकांनी साधुचे हे सामर्थ पाहिले. पण फार काळ कुठे पाहवले ? त्यांनी त्या वाघाला चिथावले. खरेच रे तू मातीचाच गोळा. मुळावरच तू गेला. अरे, साधूपुढे घोळतोस गोंडा. वाघाच्या जातीला आणतोस कमीपणा. फोड डरकाळी आणि धाव त्या साधूवर. वाघाने मारली साधूवर उडी. साधूने जाणला त्याचा डाव. घेतले काढून त्याचे बळ. झाला पुन्हा मातीचाच दुर्बळ. आता साधू शिकला. आपल्या बळावर सत्ता दिली दुसऱ्याला, तर तो निघाला आपलाच जीव घ्यायला ?

**– किशोर गांधी**

संकलन: दिशान फिचर्स

# शिलाविहारला गोंदवलेकर महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह



नगर – सावेडी उपनगरात शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त २२ जुलैपासून अखंड हरिनाम सप्ताह आणि श्रीमद् भागवत कथा याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती हभप सुंदरदास रिंगणे यांनी दिली.

या सप्ताहात २४ तास अखंड नामजप तसेच श्रीं चे ग्रंथ वाचन पारायण सोहळा सकाळी ९ ते ११ या वेळेत व्यासपीठ चालक सौ.मनीषा भोंग पारायण वाचन करणार आहेत. हभप धनंजय महाराज क्षीरसागर भागवत कथा सांगणार असून दररोज दुपारी ३ ते ६ या वेळेत ही कथा होईल. अखंड नामजपासाठी दर एक तासाला भाविक बसणार आहेत. या सप्ताहात पहाटे रुद्राभिषेक, सकाळी ग्रंथ वाचन, दुपारी महाआरती होऊन महाप्रसाद होईल. सायंकाळी हरिपाठ व रात्री पंचपदी भजन असे कार्यक्रम होणार आहेत. याचा लाभ घेण्याचे आवाहन हभप सौ.रेखाताई रिंगणे यांनी केले आहे.

ज्या भाविकांना पारायण सोहळा मध्ये सहभागी होऊन श्रींचे ग्रंथ वाचन करायचे आहे त्यांनी विजय मते ९२ २५ ३२ २३ ८९ संपर्क करावा म्हणजे ग्रंथ उपलब्ध करता येतील.

या अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेची सांगता गुरुपौर्णिमेला २९ जुलै रोजी सकाळी ९ ते ११ हभप गंगाधर महाराज झाडे यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाने होणार आहे. तरी भाविकांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रसाद देवा रिंगणे यांनी केले आहे.



तपोवनरोड येथील गुरुकुल कॅम्पसमधील डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक विद्यालय, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांच्या बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते.


# गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त 'बालदिंडी'

नगर – तपोवनरोड येथील गुरुकुल कॅम्पस मधील डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक विद्यालय, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांच्या बालदिंडीचे आयोजन करण्यात आले. सदर दिंडीत सकाळीच ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ मृदुंगाच्या गजरात भक्तीमय वातावरणात डोळे दिपून टाकणारा अश्वरिंगण सोहळा पार पडला. माऊलीच्या गजरात पालखीभोवती धावलेल्या अश्वाने डोळ्यांचे पारणे फेडले.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बालदिंडीप्रसंगी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा साकारली तसेच सर्व विद्यार्थ्यांनी वारकरी बनून दिंडीची शोभा वाढवली. सदर दिंडीचा शुभारंभ नगरसेविका रोशनी त्र्यंबके व उद्योजक आकाश त्र्यंबके यांनी केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष एन.ए.पठाण, शाला समिती चेअरमन अनिल साळुंके, सदस्य देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, समीर पठाण, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड इंग्लिश मिडीयम स्कूल च्या प्राचार्या दीप्ती कराळे, पालकवर्ग यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन सबिया शेख यांनी केले.

याप्रसंगी पालकवर्ग तसेच परिसरातील नागरिक दिंडीमध्ये सहभागी झाले.

# जिल्हा न्यायालय परिसरात नव्या पोस्ट ऑफिसचे उद्घाटन





पोस्ट ऑफिसचे उद्घाटन करताना पोस्टमास्टर जनरल, पुणे क्षेत्र सौ. प्रीती अग्रवाल. समवेत प्रधान जिल्हा न्यायाधिश एस. बी. कचरे आदी.

नगर – भारतीय डाक विभागाच्या वतीने नागरिकांना अधिक सुलभ, जलद, आधुनिक व दर्जेदार टपाल तसेच वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा न्यायालय परिसर, अहिल्यानगर येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालय पोस्ट ऑफिसचे उद्घाटन सौ. प्रीती अग्रवाल (IPoS), पोस्टमास्टर जनरल, पुणे क्षेत्र, पुणे यांच्या हस्ते उत्साहात झाले. या उद्घाटन समारंभास एस. बी. कचरे, प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर तसेच डॉ. दिलीप टिपरसे, उपपोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय न्यायालयातील न्यायिक अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, बार असोसिएशनचे पदाधिकारी, अधिवक्ते, न्यायालयीन कर्मचारी, भारतीय डाक विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर नव्याने सुरू करण्यात आलेल्या पोस्ट ऑफिसची पाहणी करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना पोस्टमास्टर जनरल सौ. प्रीती अग्रवाल यांनी भारतीय डाक विभाग हा देशातील सर्वात विश्वासार्ह सार्वजनिक सेवा पुरविणारा विभाग असून बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. जिल्हा न्यायालय परिसरात सुरू करण्यात आलेले हे पोस्ट ऑफिस न्यायव्यवस्थेशी संबंधित अधिकारी, कर्मचारी, अधिवक्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच भारतीय डाक विभागामार्फत उपलब्ध असलेल्या बचत बँक, आधार सेवा, स्पीड पोस्ट, पार्सल, नोंदणीकृत टपाल, पोस्टल लाईफ इन्शुरन्स, ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक आणि इतर वित्तीय सेवांचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कचरे यांनी न्यायालय परिसरात पोस्ट ऑफिस सुरू झाल्यामुळे न्यायालयीन कामकाजाशी संबंधित पत्रव्यवहार अधिक सुलभ, सुरक्षित व वेळेवर होण्यास मोठी मदत होईल, तसेच न्यायालयातील अधिकारी, कर्मचारी, अधिवक्ते आणि नागरिकांना विविध टपाल व बँकिंग सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने त्यांचा वेळ व श्रम वाचतील, असे मत व्यक्त केले.

नवीन पोस्ट ऑफिसमध्ये स्पीड पोस्ट, नोंदणीकृत टपाल, पार्सल बुकिंग, बचत बँक व्यवहार, आधार नोंदणी व अद्ययावत सेवा, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या सेवा, पोस्टल लाईफ इन्शुरन्स, ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स तसेच भारतीय डाक विभागाच्या इतर सर्व महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे न्यायालय परिसरातील नागरिकांना विविध सेवांसाठी शहरातील इतर पोस्ट ऑफिसमध्ये जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

कार्यक्रमाचे आयोजन विकास पालवे, वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टरीत्या करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अहिल्यानगर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्राचा लाडका कवी २०२६ स्पर्धेत दत्तात्रय वारकड यांना 'प्रथम पुरस्कार'



नगर – काव्ययोग काव्यसंस्था, पुणे यांच्या वतीने महाराष्ट्राचा लाडका कवी २०२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील १८७ कवींनी भाग घेतला होता. या स्पर्धेत अहिल्यानगर येथील दत्तात्रय वारकड यांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या जीवन प्रवास वर्णन करणारी, ज्ञानज्योत स्वरचित काव्य सादर केले. या ऑनलाइन स्पर्धेला कवी दत्तात्रय वारकड यांना ९७०० 'व्यूव्हज' मिळाले. असून १४०० लाईक तर ४०५ कमेंट मिळाले आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक मते व कवितेला मोठ्या प्रमाणात पसंती मिळाल्याने काव्ययोग काव्यसंस्थेच्या वतीने कविवर्य दत्तात्रय वारकड यांना महाराष्ट्राचा लाडका कवी स्पर्धेत प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

या कवितेला लेखक, कवि, साहित्यिक क्षेत्रातील, डॉक्टर, वकील राजकीय मंडळी, नगरसेवक, महापौर, उपमहापौर, पत्रकारांनी कवितेला अभिप्राय दिले आहे. तसेच रशिया, दुबई, मुंबई, बिहार, गुजरात, महाराष्ट्र या ठिकाणच्या व्यक्तींकडून कवितेला सुंदर असे अभिप्राय आले आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# सारसनगरमधील सिदाजी आप्पा मंदिर मार्गाला 'बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मार्ग' नाव द्या

### वीरशैव लिंगायत गवळी समाजाचे आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन; दोन प्रमुख रस्त्यांना माजी नगरसेवकांची नावे देण्याचीही मागणी



बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला 'बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मार्ग' असे नामकरण करण्यात यावे, आदी मागणीसंदर्भात महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे आदी. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – सारसनगर येथील बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला 'बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मार्ग' असे नामकरण करण्यात यावे, तसेच धरती चौक ते परशुराम खुंट या रस्त्यास माजी नगरसेवक स्व. आप्पासाहेब भाऊसाहेब हरबा यांचे, तर हातमपुरा ते नालबंद खुंट या रस्त्यास माजी नगरसेवक स्व. गोपीनाथ भिकाजी मिसाळ यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या वतीने करण्यात आली.

या मागणीसंदर्भात महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आमदार संग्राम जगताप, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संतोष गेन्नाप्पा, सतीश हरबा, गोविंद मिसाळ, चंद्रकांत औशीकर, विष्णू कलागते, सटवाजी गेन्नाप्पा, पैलवान सतीश हरबा, आप्पासाहेब बारसे, संतोष उन्हाळे, शंकरराव पंगुडवाले, मोहन हिरणवाळे, विशाल भागानगरे, लंकेश काटकर, ओंकार हरबा, योगेश मिसाळ, रमेश मिसाळ आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा हे वीरशैव लिंगायत गवळी समाजाचे उभ्या महाराष्ट्रातील आराध्य दैवत आहेत. दिवंगत माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या सहकार्याने सारसनगर येथे त्यांचे मंदिर उभारण्यात आले असून राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. त्यामुळे मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्याला 'बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मार्ग' असे अधिकृत नामकरण करण्यात यावे, अशी समाजाची भावना असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली व नगरसेवक प्रकाश भागानगरे यांच्या नेतृत्वाखाली महापौर ज्योतीताई गाडे तसेच आयुक्त यशवंत डांगे यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात माजी नगरसेवक स्व. आप्पासाहेब भाऊसाहेब हरबा यांच्या सामाजिक योगदानाचा गौरव म्हणून धरती चौक ते परशुराम खुंट या रस्त्याला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच माजी नगरसेवक स्व. गोपीनाथ भिकाजी मिसाळ यांनी समाजकारण आणि लोकसेवेत दिलेल्या योगदानाचा सन्मान म्हणून हातमपुरा ते नालबंद खुंट या रस्त्याला त्यांचे नाव देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली.

या मागण्यांबाबत महापालिका प्रशासनासोबत सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली. संबंधित सर्व नामकरण प्रस्ताव नियमांनुसार पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेतले जातील, असे आश्वासन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी शिष्टमंडळाला दिले.

# निरामय

## तरुणांच्या हाडांची घनताही होतेय कमी

व्याधी विचार



अनेक वर्षांपासून 'ऑस्टिओपोरोसिस' हा आजार प्रामुख्याने रजोनिवृत्तीनंतरच्या महिलांमध्ये आणि वृद्धांमध्ये आढळणारा आजार म्हणून ओळखला जात होता; मात्र आजची वस्तुस्थिती वेगळी आहे. जगभरात वाढत्या प्रमाणात तरुण पुरुषांमध्येही ऑस्टिओपोरोसिस आणि कमी हाडांची घनता (लो बोन डेन्सिटी) आढळून येत आहे.

हाडे ही जिवंत ऊती (टिश्यू) असून त्यामध्ये सतत पुनर्बांधणीची प्रक्रिया सुरू असते. साधारणपणे वयाच्या वीसच्या दशकाच्या अखेरीस शरीराची हाडांची कमाल घनता (पीक बोन मास) विकसित होते. या काळात हाडांच्या विकासात कोणताही अडथळा निर्माण झाल्यास पुढील आयुष्यात 'ऑस्टिओपोरोसिस'चा धोका वाढू शकतो. सामान्यतः पुरुषांची हाडे महिलांच्या तुलनेत मोठी आणि अधिक मजबूत असतात; मात्र यामुळे पुरुषांना 'ऑस्टिओपोरोसिस' किंवा इतर हाडांच्या आजारांपासून पूर्ण संरक्षण मिळते असे नाही. अनेकदा पुरुषांमधील 'ऑस्टिओपोरोसिस'चे निदानही वेळेवर होत नाही.

तरुण पुरुषांमध्ये हाडांची घनता कमी होण्यामागील प्रमुख कारणांपैकी एक म्हणजे वाढती बैठी जीवनशैली. दीर्घकाळ डेस्कवर बसून काम करणे आणि वजन उचलण्याचे किंवा हाडांवर ताण देणारे व्यायाम कमी करणे याचा हाडांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. याशिवाय आहाराच्या सवयींमध्येही मोठा बदल झाला आहे. अनेक तरुणांच्या आहारात कॅल्शियमचे प्रमाण अपुरे असते, तर 'जंक फूड'चे सेवन अधिक असते. तसेच, भारतासारख्या भरपूर सूर्यप्रकाश असलेल्या देशातही व्हिटॅमिन डीची कमतरता मोठ्या प्रमाणात आढळून येते. यामागील प्रमुख कारण म्हणजे घरातील वाढता वेळ आणि सूर्यप्रकाशाचा अभाव. कॅल्शियमचे शोषण वाढवून हाडांच्या मजबुतीसाठी व्हिटॅमिन डी महत्त्वाची भूमिका बजावते.

काही आजार आणि औषधांमुळेही तरुण पुरुषांमध्ये हाडांची घनता कमी होऊ शकते. 'हायपोगोनॅडिझम'सारख्या स्थितीत शरीरात 'टेस्टोस्टेरॉन हार्मोन'चे प्रमाण कमी होते. त्याचा हाडांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. याशिवाय 'इन्फ्लेमेटरी बाऊल डिसीज', 'सिलिॲक डिसीज', 'क्रॉनिक किडनी डिसीज' आणि विविध अंतःस्रावी (एंडोक्राइन) विकारांमुळे हाडांच्या चयापचय प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. धूम्रपान आणि मद्यपान यांमुळेही हाडे कमकुवत होण्याचा धोका वाढतो. चांगली बाब म्हणजे, हाडांची झीज वेळेवर ओळखल्यास ती रोखता किंवा नियंत्रित करता येऊ शकते. नियमित वजन उचलण्याचे व्यायाम, रेझिस्टन्स ट्रेनिंग, पुरेसे कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीचे सेवन, धूम्रपान टाळणे, मद्यपानावर नियंत्रण ठेवणे आणि नियमित वैद्यकीय तपासणी यामुळे हाडांची घनता सुधारण्यास मदत होऊ शकते.

## ड्रॉप आय सिंड्रोमच्या रुग्णांमध्ये वाढ

जाणून घ्या




आजकाल सकाळी डोळे उघडल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत स्मार्टफोन आपल्या हाताचा एक भाग बनला आहे. ऑफिसचे काम असो वा 'सोशल मीडिया'वरील रील्स पाहणे, आपला स्क्रीन टाईम वाढत चालला आहे; पण हीच सवय आता आरोग्यासाठी धोक्याची घंटा ठरत आहे. हॉस्पिटल्समधील ओपीडीत सध्या 'ड्राय आय सिंड्रोम'चे रुग्ण झपाट्याने वाढत असून, याला कारणीभूत ठरत आहे मोबाईलचे व्यसन !

अनेक संशोधनांमधून समोर आले आहे, की जेवताना स्क्रीन पाहिल्यामुळे मुलांची पचनसंस्था बिघडते. परिणामी, त्यांची शारीरिक आणि मानसिक वाढ योग्य प्रकारे होत नाही. तज्ज्ञांनी या समस्येमागचे मुख्य कारण सांगितले आहे. आपले डोळे चांगले ठेवण्यासाठी डोळ्यातील पाण्याचा एक थर गरजेचा असतो. साधारणपणे आपण एका मिनिटात १५ ते २० वेळा पापण्यांची उघडझाप करतो. त्यामुळे डोळ्यांत ओलावा टिकून राहतो. जेव्हा आपण स्क्रीनवर एखादा व्हिडीओ पाहतो, तेव्हा आपला फोकस इतका वाढतो, की आपण पापण्या झपकावणे विसरून जातो. अशा वेळी ब्लिंकिंग रेट कमी होऊन एका मिनिटात फक्त ५ ते ७ वेळा राहतो. यामुळे डोळ्यांतील पाणी सुकते आणि 'ड्राय आय'ची समस्या निर्माण होते. ही लक्षणे दिसल्यास व्हा अलर्ट – * डोळ्यांमध्ये सतत जळजळ किंवा टोचल्यासारखे वाटणे. *डोळे लाल होणे आणि जड वाटणे * स्क्रीन पाहताना अचानक अंधूक दिसणे. * डोळ्यांच्या सुरक्षेसाठी वापरा '२०-२०-२० रूल' लॅपटॉप किंवा मोबाईलशिवाय काम होऊच शकत नसेल, तर डॉक्टरांनी डिजिटल युजर्ससाठी एक बेस्ट फॉर्म्युला सांगितला आहे. * दर २० मिनिटांच्या स्क्रीन टाईमनंतर एक छोटा ब्रेक घ्या. * स्क्रीनवरून नजर हटवून कमीत कमी २० सेकंद आराम घ्या. * या २० सेकंदात तुमच्यापासून २० फूट लांब असलेल्या एखाद्या वस्तूवर लक्ष केंद्रित करा.

## वाईट कोलेस्टेरॉलवर नियंत्रणासाठी नवी पद्धत

नव संशोधन



हृदयविकाराचा झटका आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचे प्रमुख कारण मानल्या जाणाऱ्या 'एलडीएल' (लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन) अर्थात 'वाईट' कोलेस्टेरॉलवर नियंत्रण मिळवण्यासाठी मुंबई आयआयटीच्या शास्त्रज्ञांनी एक नवी आणि आशादायक पद्धत शोधून काढली आहे. या संशोधनामुळे भविष्यात उच्च कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइड्सच्या उपचारांसाठी पूर्णपणे वेगळा मार्ग उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या संशोधनाचे निष्कर्ष नुकतेच प्रतिष्ठित 'प्रोसिडींग्ज ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' (पीएनएएस) या आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकात प्रकाशित झाले आहेत. सध्या उच्च 'एलडीएल' कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यासाठी स्टॅटिन्ससारखी औषधे मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. या औषधांमुळे कोलेस्टेरॉल निर्मितीवर नियंत्रण ठेवता येते; मात्र रक्तातील ट्रायग्लिसराइड्स कमी करण्यासाठी उपलब्ध पर्याय तुलनेने मर्यादित आहेत. याच पार्श्वभूमीवर आयआयटीच्या संशोधकांनी शरीरातील चरबीच्या वहन प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केले आहे.

संशोधनानुसार, यकृत हे शरीरातील चरबीच्या चयापचयाचे मुख्य केंद्र आहे. यकृताच्या पेशींमध्ये 'लिपिड ड्रॉपलेट्स' नावाचे सूक्ष्म चरबीचे साठे असतात. या साठ्यांमध्ये कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइड्स तात्पुरते साठवले जातात. शरीराला गरज भासल्यास हे 'लिपिड ड्रॉपलेट्स' पेशींच्या विशिष्ट भागात नेले जातात. तेथे त्यांचे 'व्हेरी लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन' (व्हिएलडीएल) मध्ये रूपांतर करून रक्तप्रवाहात सोडले जाते. पुढे याच प्रक्रियेतून 'एलडीएल कोलेस्टेरॉल'ची निर्मिती होते. 'आयआयटी'चे प्राध्यापक रूप मलिक यांच्या नेतृत्वाखालील संशोधन पथकाने या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. संशोधकांनी एक विशेष प्रकारचा लघु प्रथिनीय घटक (पेप्टाइड) विकसित केला आहे. हा पेप्टाइड यकृतातून रक्तात चरबी पाठवण्याच्या प्रक्रियेची गती कमी करू शकतो. परिणामी रक्तातील एलडीएल कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइड्सचे प्रमाण कमी होण्यास मदत होऊ शकते.

प्रा. मलिक यांनी या प्रक्रियेचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण देताना सांगितले, की यकृतातील चरबीचे लहान गोळे पेशींच्या विशिष्ट ठिकाणी नेले जातात आणि त्यानंतर त्यांचे लिपोप्रोटीनमध्ये रूपांतर होऊन ते रक्तात सोडले जातात. जर ही चरबी रक्तात पाठवण्याची प्रक्रिया नियंत्रित करता आली, तर भविष्यात रक्तातील घातक चरबी कमी करण्यासाठी नवीन उपचारपद्धती विकसित होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, या संशोधनाचे महत्त्व केवळ 'एलडीएल कोलेस्टेरॉल' कमी करण्यापुरते मर्यादित नाही. हृदयविकार, स्ट्रोक आणि रक्तवाहिन्यांमध्ये चरबी साचण्याशी संबंधित अनेक आजारांच्या प्रतिबंधासाठीही ही पद्धत उपयुक्त ठरू शकते.

## कमी वजनामुळे गुडघे कार्यक्षम

आरोग्यचर्चा

गुडघ्यांच्या समस्येने त्रस्त असलेल्या लोकांसाठी शरीराचे वजन नियंत्रित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. 'अमेरिकन कॉलेज ऑफ ह्रुमेटॉलॉजी/आर्थरायटिस फाउंडेशन'नुसार, शरीराचे वजन पाच टक्के किंवा त्याहून अधिक कमी केल्यास गुडघ्याची कार्यक्षमता आणि उपचारांचे परिणाम या दोन्हीवर सकारात्मक प्रभाव पडतो.

ज्या लोकांना वजन नियंत्रित ठेवण्यात अडचणी येतात, त्यांना अनेकदा आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागते, विशेषतः सांध्यांच्या तक्रारी वाढतात. अतिरिक्त वजनाचा सांध्यांवर लक्षणीय परिणाम होतो. सांध्यांवर आणि नितंबांवर प्रचंड दाब पडतो. त्यामुळे तीव्र वेदना होतात. काळानुरूप सांध्यांची झीज होते आणि दैनंदिन कामे करणे कठीण होऊन बसते. यामुळे ऑस्टियोआर्थरायटिस, लचक भरणे, ताण येणे, फ्रॅक्चर, बर्साइटिस आणि ह्रुमेटॉइड आर्थरायटिस यांसारख्या सांध्यांशी संबंधित आजारांचा धोका वाढू शकतो. या सांध्यांच्या समस्यांमुळे माणसाच्या हालचालींवर मर्यादा येतात. म्हणूनच भविष्यातील आरोग्याचे धोके टाळण्यासाठी वजन नियंत्रित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.



शरीराचे वजन प्रत्येक एक पाऊंडने (सुमारे ४५० ग्रॅम) वाढल्यास, गुडघ्यांना ४ ते ६ पाऊंड अतिरिक्त दाब सहन करावा लागतो. यामुळे ऑस्टियोआर्थरायटिस, सांधेदुखी आणि सांध्यांचे इतर आजार होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. वैज्ञानिक भाषेत गुडघ्यावरील या दाबाला 'पॅटेलोफेमोरल जॉइंट रिएक्शन फोर्स' असे म्हणतात. हा दाब सांध्यांची स्थिरता, कुर्चाचे आरोग्य, अस्थिबंधनावरील ताण आणि मेनिस्कसच्या मजबुतीवर परिणाम करतो. गुडघ्यावरील दाबासाठी शरीराचे वजन, बॉडी मास इंडेक्स (बीएमआय), उठण्या-बसण्याची पद्धत (पोस्टर), चालण्याची पद्धत, स्नायूंची ताकद आणि संतुलन (विशेषतः क्वाड्रिसेप्स, हॅमस्ट्रिंग आणि ग्लूट्स) तसेच तुम्ही वापरत असलेली चप्पल यांसारखे अनेक घटक कारणीभूत ठरतात. धावणे, उड्या मारणे आणि उठाबशा काढणे यांसारख्या हालचालींमुळे गुडघ्यांवरील दाब आणखी वाढतो.

गुडघ्यांचे आरोग्य राखण्यासाठी वजन नियंत्रित ठेवणे हाच मुख्य उपाय आहे. याशिवाय क्वाड्रिसेप्स, हॅमस्ट्रिंग आणि ग्लुट्सचे स्नायू मजबूत करणारे व्यायाम करणे आवश्यक आहे. लवचिकता सुधारणे, चांगल्या दर्जाची चप्पल वापरणे आणि उठण्या-बसण्याची योग्य पद्धत ठेवणे तितकेच फायदेशीर ठरते. गुडघ्यांवर जास्त ताण आणणाऱ्या व्यायामांऐवजी सायकलिंग किंवा स्विमिंग (पोहणे) यांसारखे कमी प्रभावाचे व्यायाम करावेत. गुडघ्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी पुरुषांनी आणि महिलांनी आपला बीएमआय १८.५ ते २४.९ दरम्यान राखण्याचा, तर कंबर आणि नितंबांचे गुणोत्तर पुरुषांसाठी ०.९ किंवा त्यापेक्षा कमी आणि महिलांसाठी ०.८ किंवा त्यापेक्षा कमी ठेवण्याचा सल्ला देतात. अस्थिरोग तज्ज्ञ किंवा फिजिओथेरपिस्टचा सल्ला घेऊन स्वतःसाठी योग्य व्यायाम प्रकार निवडावेत.

## कोणतं पेय ठरतं योग्य?

आयुर्वेद आणि विकार

आहे. आपण विविध प्रकारची पेयं पितो. आयुर्वेदानुसार शरीरातले दोष आणि पेयं यांचा खूप जवळचा संबंध आहे. म्हणूनच कोणती पेयं प्यायला हवीत याबाबतचं हे मार्गदर्शन...

आयुर्वेदाने वात, पित्त आणि कफ असे त्रिदोष सांगितले आहेत. निरोगी रहाण्यासाठी या तीन दोषांचं संतुलन राखणं गरजेचं असतं. आयुर्वेदिक उपचारांमध्ये तज्ज्ञमंडळी तुमचा दोष ओळखून त्यानुसार उपायोजना करतात. दोषानुसार आहार, व्यायाम सुचवले जातात. आपल्या आहाराचा आणि या दोषांचा जवळचा संबंध

* वात दोषामुळे शरीर कोरडं पडत असल्यामुळे हा दोष असणाऱ्यांनी जास्तीत जास्त द्रव पदार्थांचं सेवन करायला हवं. फळं, भाज्या तसंच इतर द्रवपदार्थांचं सेवन करून तुम्ही पाण्याची गरज भागवू शकता. वात दोष असणारे लोक बारीक असतात. हे लोक उत्साही आणि कल्पकही असतात. त्यांना आरोग्य राखण्यासाठी हर्बल चहा, दूध, फळं आणि भाज्यांचे रस यांचं सेवन करता येईल. ब्लॅक टी, ग्रीन टी, कॉफी, कॅफेनयुक्त पेयं, फसफसणारी पेयं यांचं सेवन मात्र टाळावं.

* पित्त दोषामध्ये मध्यम प्रमाणात पाणी प्यावं लागतं. पित्त दोष असणाऱ्यांना खूप थंडी वाजते. हे लोक मध्यम बांध्याचे असतात. त्यांच्या चेहऱ्यावर मुरुमांचं प्रमाणही अधिक असतं. या लोकांनी नारळाचं पाणी, हिरव्या भाज्यांचे रस, गोड फळांचे रस तसंच जास्वंद, लवेंडर, गुलाब तसंच जास्मिन फ्लेवरचे हर्बल टीही पिता येईल. बीयर, वाईन तसंच आंबट फळांचे सर मात्र टाळावेत.



* कफ दोष असणाऱ्यांना पाणी कमी प्रमाणात प्यायलं तरी चांगतं.

## पुरुषांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण अधिक

जीवनशैली

आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, असे आपण अनेकदा म्हणतो; मात्र आजच्या बदलत्या काळात पुरुषांच्या बाबतीत हे विधान अधिक गंभीर होताना दिसत आहे. वाढते कामाचे स्वरूप, बदललेली जीवनशैली आणि आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष यामुळे पुरुषांमध्ये हृदयविकाराचा धोका कितीतरी पटीने वाढल्याचे पाहायला मिळत आहे. केवळ वाढते वयच नाही, तर आता तरुण वयातही हृदयविकाराचे झटके येण्याचे प्रमाण चिंताजनक आहे.



अनेक वैद्यकीय संशोधनांतून आणि आरोग्य अहवालांमधून एक चिंतेची बाब समोर आली आहे, ती म्हणजे महिलांच्या तुलनेत पुरुषांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता लक्षणीयरीत्या जास्त असते. केवळ धावपळीची जीवनशैलीच नाही, तर शरीरातील अंतर्गत बदल, मानसिक ताण आणि खाण्याच्या सवयी याला मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरत आहेत.

* वाढता मानसिक आणि आर्थिक ताण

पुरुषांच्या आयुष्यात अनेकदा व्यावसायिक स्पर्धा, कामाचा वाढता ताण आणि कौटुंबिक आर्थिक जबाबदाऱ्यांचे ओझे असते. सततच्या या मानसिक तणावामुळे रक्तदाब वाढतो. त्याचा थेट परिणाम हृदयाच्या आरोग्यावर होतो. अपुरी झोप आणि विश्रांतीचा अभाव यामुळे हृदयाचे स्नायू कमकुवत होऊ लागतात.

*धूम्रपान आणि तंबाखूचे सेवन

तज्ज्ञांच्या मते, महिलांच्या तुलनेत पुरुषांमध्ये धूम्रपानाचे प्रमाण जास्त आढळते. धूम्रपानामुळे हृदयाच्या धमन्यांमध्ये विषारी घटक जमा होतात. त्या अरुंद किंवा कमकुवत होतात.

## कारणं स्नायूदुखीची

आरोग्यवेध



अतिताण हे स्नायूंमधल्या वेदनांचं कारण असू शकतं यावर कदाचित आपला विश्वास बसणार नाही. ताणतणावाचा संबंध मानसिक आरोग्याशी जोडला जातो. पण याच ताणामुळे स्नायूंचं दुखणं उद्भवू शकतं. स्ट्रेस हार्मोन्समुळे शरीर व्याधींचा मुकाबला करू शकत नाही. तणावाखाली असणाऱ्या माणसांची दमछाक होते. तसंच दाहामुळे त्यांच्या स्नायूंमध्ये वेदना जाणवू शकतात. त्यामुळे खूप ताण आल्यावर अंग दुखू लागतं. पाण्याची कमतरता हे सुद्धा स्नायूंच्या दुखण्याचं महत्त्वाचं कारण म्हणता येईल. पाणी हा शरीराला अत्यंत आवश्यक असणारा घटक आहे. त्यामुळे पाण्याची कमतरता तुमचं आरोग्य बिघडवू शकते. पाण्याच्या कमतरतेमुळे डोकेदुखी, थकवा तसंच इतर समस्या जाणवू शकतात. शरीराला आपलं कार्य सुरू ठेवण्यासाठी विविध पोषक घटकांची आवश्यकता असते. या पोषक घटकांमुळे आपला मेंदू तल्लख होतो. हाडं बळकट होतात आणि शरीर निरोगी रहातं. एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेमुळे स्नायूंमध्ये वेदना जाणवू शकतात.

### नवसंशोधन

### अतिझोप ठरते घातक!

पुरेशी झोप घेणं किती गरजेचं आहे हे आपण जाणतो. पण जास्तीची झोपही घातक ठरू शकते. नऊ तासांपेक्षा अधिक झोप घेतल्यास पक्षाघाताचा धोका जवळपास २३ टक्क्यांनी वाढत असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. सात तास किंवा आठ तासांपेक्षा कमी झोप घेणाऱ्यांच्या तुलनेत नऊ तासांपेक्षा अधिक झोप घेणाऱ्यांना पक्षाघात होण्याची शक्यता अधिक असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. इतकंच नाही तर दुपारच्या वेळी अधिक झोप घेतल्यानेही त्रास होऊ शकतो. दुपारच्या वेळी ९० मिनिटांपेक्षा अधिक झोप घेणाऱ्यांनाही पक्षाघात होण्याची शक्यता २५ टक्क्यांनी वाढत असल्याचं हे संशोधन सांगतं. 'न्यूरोलॉजी' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे. त्यामुळे झोप प्रमाणातच घेणं योग्य ठरतं.




### काळजी डोळ्यांची

### का सुजतात डोळे?

पुरेशी झोप घेतल्यानंतरही अनेकदा आपले डोळे सुजल्यासारखे, थकल्यासारखे दिसतात. यामागे बरीच कारणं असतात. ॲलर्जी किंवा जंतूसंसर्गामुळे डोळे सुजल्यासारखे दिसू शकतात. प्रदूषित कण किंवा कुत्रा-मांजरासारख्या पाळीव प्राण्यांचे केस डोळ्यात गेल्यामुळे ॲलर्जी होऊ शकते आणि यामुळे शांत झोप घेतल्यानंतरही डोळे सुजल्यासारखे दिसतात. पाण्याच्या कमरतेमुळेही डोळे सुजल्यासारखे वाटतात. आपल्या डोळ्यांलगतची त्वचा खूप नाजूक असते आणि पाण्याच्या कमतरतेमुळे ती कोरडी पडून सुजल्यासारखी वाटते.



### जपणूक त्वचेची




### 'बायोटिन'च्या सेवनाने...

त्वचेचं आरोग्य जपण्यासाठी विविध पोषक घटकांची गरज असते. या पोषक घटकांमुळे त्वचेशी संबंधित समस्या दूर होऊ शकतात. 'बायोटिन' नामक जीवनसत्त्व त्वचेसाठी खूप लाभादायी ठरतं. बायोटिन हा ब जीवनसत्त्व गटातला घटक आहे. बायोटिनला 'ब ७' असंही म्हटलं जातं. पालक, अंडी, मशरूम, बदाम, फ्लॉवर, चीझ, रताळं, शेंगदाणे, आक्रोड आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये ब ७ हे जीवनसत्त्व असतं. त्यामुळे यांचा समावेश आहारात करायला हवा.

### आजीबाईचा बटवा

### आरोग्यदायी जर्दाळू

जर्दाळू अत्यंत पौष्टिक आहे. हिवाळ्यात जर्दाळूचं सेवन करायला हवं. यात तंतूमय पदार्थांचं प्रमाण बरंच जास्त असतं. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी जर्दाळूचं सेवन करता येईल. यातल्या फायबरमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं रहातं. पण जर्दाळूचं सेवन प्रमाणातच करायला हवं. जर्दाळूमध्ये लोहही भरपूर प्रमाणात असतं. यामुळे शरीरातली लोहाची कमतरता यामुळे भरून निघते. जर्दाळूतले पोषक घटक त्वचेसाठीही लाभदायी ठरतात. यातल्या 'क' आणि 'ई' या जीवनसत्त्वांमुळे त्वचेला आवश्यक पोषण मिळतं. जर्दाळू डोळ्यांसाठीही लाभदायी आहे. तसंच यामुळे पचनसंस्थेचं कार्यही सुधारतं. तर अशा या जर्दाळूचा समावेश आहारात करायलाच हवा.



# मतदार यादी पुनरीक्षणासाठी शिक्षकांची नियुक्ती थांबवा

## विद्यार्थ्यांचे शिक्षण वाऱ्यावर, शिक्षकांना दारोदारी भटकण्यास भाग पाडू नका : बाबासाहेब बोडखे



नगर – मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेसाठी शिक्षकांची वर्ग सुरू असतानाच नियुक्ती केल्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असून, विशेषतः गोरगरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने केला आहे. पोलीस विभागाप्रमाणेच शिक्षक कर्मचाऱ्यांनाही अशैक्षणिक व इतर प्रशासकीय कामांपासून वगळण्यात यावे आणि त्यांची सेवा कोणत्याही परिस्थितीत अधिग्रहित करू नये, अशी मागणी शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री तसेच शिक्षण विभागाकडे निवेदनाद्वारे केली असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग विरुद्ध सेंट मर्सी स्कूल या प्रकरणात ६ डिसेंबर २००७ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची निवडणुकीसंदर्भातील कामांसाठी नियुक्ती शक्यतो सुट्टीच्या दिवशी, अध्यापन नसलेल्या दिवशी किंवा शाळेच्या वेळेनंतरच करावी, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या निर्णयामागील मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये हा होता.

मात्र प्रत्यक्षात राज्यातील शिक्षकांना वर्ग सुरू असतानाच मतदार यादी पुनरीक्षणाचे काम सोपविण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर कामात अडचणी आल्यास संबंधित शिक्षकांवर एफआयआर दाखल करण्याची धमकी दिली जात असल्याचा आरोपही शिक्षक परिषदेने केला आहे. त्यामुळे शिक्षकांना अपमानास्पद वागणूक मिळत असून त्यांच्याकडून वेठबिगाराप्रमाणे काम करून घेतले जात असल्याची भावना शिक्षकांमध्ये निर्माण झाली आहे.

अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांना अध्यापनाचे काम बाजूला ठेवून मतदार यादी पुनरीक्षणासाठी दारोदारी जाऊन माहिती संकलित करण्यास भाग पाडले जात आहे. परिणामी वर्गातील विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापन विस्कळीत होत असून विशेषतः ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याची कोणतीही चिंता शासन व प्रशासनाला नसल्याचा आरोपही शिक्षक परिषदेने केला आहे.

शिक्षक परिषदेच्या मते, शिक्षकांचे मनुष्यबळ शैक्षणिक कार्यासाठी असून ते निवडणूक अथवा इतर अशैक्षणिक कामांसाठी सातत्याने वापरणे ही गंभीर बाब आहे. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी तडजोड करणे सामाजिक हिताच्या दृष्टीनेही अयोग्य असून, पोलीस विभागाप्रमाणेच शिक्षक कर्मचाऱ्यांनाही अशैक्षणिक कामांमधून कायमस्वरूपी वगळण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घ्यावा. गोरगरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या भविष्यावर निर्माण झालेले हे संकट तातडीने दूर करून शिक्षकांना पुन्हा पूर्णवेळ अध्यापनासाठी उपलब्ध करून द्यावे, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन करावे, अशी मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

# २९ जुलैपूर्वी विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत सहभागी व्हा अन्यथा आपले नाव मतदार यादीतून वगळले जाऊ शकते

## प्रशासनास सहकार्य करण्याचे उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांचे आवाहन



नगर – भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत नागरिकांनी २९ जुलैपूर्वी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक सहकार्य करून पडताळणी प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी; अन्यथा मतदार यादीतून नाव वगळले जाऊ शकते. त्यामुळे या मोहिमेत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन २२५ – अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व त्रुटीमुक्त करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घराघरांत जाऊन प्रत्यक्ष पडताळणीचे काम करत आहेत. प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. मात्र, पडताळणीदरम्यान काही ठिकाणी नागरिक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रतिसाद देत नाहीत, माहिती देण्यास टाळाटाळ करतात, चुकीची माहिती देतात किंवा आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. स्थलांतरित व मयत मतदारांबाबत वेळेवर माहिती मिळत नसून स्थलांतरित मतदारांच्या पंचनाम्यावर स्वाक्षरी करण्यासही काही नागरिक नकार देत असल्याने पडताळणीच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे निवडणूक प्रशासनाचे अधिकृत प्रतिनिधी असून ते नागरिकांचा मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांची प्रत्येक भेट मतदाराच्या नोंदीची खातरजमा करण्यासाठी असते. नागरिकांनी त्यांना काही मिनिटे देऊन योग्य माहिती व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यास मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत होण्यास मदत होईल.

विशेष सखोल पुनरीक्षण हा केवळ प्रशासनाचा उपक्रम नसून लोकशाही बळकट करण्यासाठीचा सामूहिक प्रयत्न आहे. आज दिलेले काही मिनिटांचे सहकार्य भविष्यात मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यास उपयुक्त ठरेल. सक्षम लोकशाहीसाठी अचूक मतदार यादी महत्त्वाची असल्याने सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही श्री. पाटील यांनी केले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात वादळी पावसाचा येलो अलर्ट

नगर – भारतीय हवामान विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी १८ आणि १९ जुलै रोजी वादळी पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस, हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस तसेच ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यात पावसाचा जोर वाढल्यास भीमा नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी यांनी केले आहे.

१८ जुलै रोजी दुपारी १२ वाजता दौंड पुलाजवळ भीमा नदीत ३ हजार ६२५ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू होता. अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाल्यास किंवा धरणांमधून पाणी सोडण्यात आल्यास भीमा नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी पाणीपातळी वाढल्यास सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

नदी, ओढे किंवा नाल्यांवरील पूल पाण्याखाली गेल्यास ते ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. धरण व नदी परिसरात जाणाऱ्या पर्यटकांनी विशेष खबरदारी घ्यावी. पाण्यात उतरणे टाळावे तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी किंवा छायाचित्रे काढू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

वादळी वारे व मेघगर्जनेच्या वेळी नागरिकांनी झाडांखाली, मोकळ्या मैदानात, टॉवर, ध्वजस्तंभ, विजेचे खांब, धातूचे कुंपण किंवा विद्युत रोहित्राजवळ थांबू नये. लोंबकळणाऱ्या तारांपासून दूर राहावे. विजांच्या कडकडाटाच्या वेळी विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. तसेच ट्रॅक्टर, शेतीची अवजारे आणि दुचाकींपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जाहिरात फलक कोसळून होणारे अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी फलकांच्या आसपास थांबू नये. विजा चमकत असताना उघड्यावर अडकल्यास गुडघ्यावर बसून हातांनी कान झाकावेत व डोके गुडघ्यांमध्ये ठेवावे, जेणेकरून जमिनीशी कमीत कमी संपर्क राहील, असा सल्ला प्रशासनाने दिला आहे.

अतिवृष्टीमुळे भूस्खलनाची शक्यता असल्याने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या नागरिकांनी वेळीच सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. घाट रस्त्याने प्रवास टाळावा. जुन्या किंवा मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये आश्रय घेऊ नये. नागरिकांनी वादळी वारे, वीज आणि पावसापासून स्वतःसह जनावरांचे संरक्षण करावे तसेच स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाणे, तहसील कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षाशी ०२४१–२३२३८४४, ०२४१–२३५६९४०, ११२ किंवा १०७७ वर संपर्क साधावा

# महिला पोलीस अंमलदारावर हल्ला; सोन्याची अंगठी पळवली; गुन्हा दाखल

नगर – शहरातील कोतवाली पोलीस ठाण्यात कार्यरत महिला पोलीस कर्मचारी या पंचपीर चावडी परिसरात एका गुन्ह्याचा पंचनामा करत असताना त्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत शासकीय कामात अडथळा आणल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या झटापटीत त्यांच्या हातातील ३० हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी बळजबरीने चोरून नेत जाताना त्यांना जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली.

याबाबत महिला पो.हे.कॉ. निता शाम अडसरे यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्याकडे एका दाखल गुन्ह्याचा तपास सोपवण्यात आला होता. १७ जुलै रोजी संध्याकाळी सव्वापाच वाजेच्या सुमारास त्या वरिष्ठांच्या आदेशाने गुन्ह्यातील फिर्यादी, त्यांचे वडील आणि दोन पंचांना सोबत घेऊन पंचपीर चावडी येथे घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी गेल्या होत्या. महिला पोलीस अंमलदार अडसरे या 'इ साक्ष' मोबाईल ॲपद्वारे ऑनलाईन पद्धतीने घटनास्थळाचा पंचनामा करत असताना, तिथे एक अज्ञात इसम आला आणि त्याने पंचनाम्याच्या कामात वारंवार मध्ये–मध्ये करून अडथळा निर्माण करण्यास सुरुवात केली.

अडसरे यांनी त्या इसमाला हटकले आणि शासकीय कामात अडथळा न आणण्याबाबत सांगितले. याचा राग आल्याने त्या अज्ञात इसमाने अत्यंत आक्रमक होत नगर काय तुझ्या बापाचे आहे का? असे म्हणून अतिशय घाणेरड्या आणि अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्याने अडसरे यांना तुझा येथे काय संबंध, तुला दाखवतो मी कोण आहे, असे म्हणत अंगावर मारण्यासाठी धावून गेला. अडसरे या शासकीय गणवेशात असतानाही आरोपीने त्यांचे काहीही न ऐकता त्यांना थेट तुझा काटाच काढतो अशी जीवे मारण्याची धमकी दिली. या दरम्यान झालेल्या झटापटीचा फायदा घेऊन आरोपीने अडसरे यांच्या हातातील ३० हजार रुपये किमतीची ३ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी जबरदस्तीने हिसकावून घेतली आणि तो घटनास्थळावरून पसार झाला.

या प्रकारानंतर महिला पोलीस अंमलदार निता अडसरे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११९ (१), १३२, १२१ (१), ३५१ (२) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# पंचपीर चावडी येथे जुन्या वादातून तरुणावर फायटरने हल्ला; गुन्हा दाखल

नगर – पेट्रोल चोरीच्या जुन्या वादावरून एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना १७ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास शहरातील पंचपीर चावडी परिसरात घडली आहे. या हल्ल्यात मोईस खलील शेख (वय २०, रा. पंचपीर चावडी) हा जखमी झाला आहे.

याबाबत त्याने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा १७ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास जेवण करून फिरण्यासाठी बाहेर पडला असता, पंचपीर चावडी बोर्डाच्या बाजूला आरोपी अली जहुर शेख, अर्श फिरोज बागवान आणि त्यांच्यासोबत असलेल्या एका अनोळखी इसमाने त्याला गाठले. अली शेख याने यापूर्वी मोईसच्या मोटारसायकलमधील पेट्रोल चोरले होते, ज्या कारणावरून त्यांच्यात अबोला होता. याच रागातून आरोपींनी मोईसला गाठून मारहाण करण्यास सुरुवात केली.

दरम्यान, अर्थ बागवान याने मोईसच्या कानामागे चापट मारली, तर अली शेख याने हातातील लोखंडी फायटरने मोईसच्या डोक्यात उजव्या बाजूला मारून त्याला गंभीर जखमी केले. मोईसचा मित्र मोझ बागवान हा भांडण सोडवण्यासाठी मध्ये पडला असता आरोपींनी त्यालाही शिवीगाळ केली आणि ते मोटारसायकलवरून पसार झाले.

जखमी मोईसवर सिव्हिल हॉस्पिटल आणि त्यानंतर आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले असून, कोतवाली पोलिसांनी याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# घरात घुसून कुटुंबाला मारहाण; रोकड लंपास

नगर – शहरातील संजयनगर, काटवन खंडोबा भागात जुन्या भांडणाच्या कारणावरून एका कुटुंबाला घरात घुसून लोखंडी गज आणि लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना १६ जुलै रोजी रात्री घडली आहे.

याबाबत रोहित गोपाल वाघरी (वय २५, रा. संजय नगर, काटवन खंडोबा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या बहिणीचा साखरपुडा असल्याने ते १६ जुलै रोजी रात्री घरासमोर मंडपाचे साहित्य उतरवत होते. यावेळी जुन्या भांडणाचा राग मनात धरून महात्मा फुले वसाहतीमधील अरविंद वसंत बुटीया, राजेश वसंत बुटीया, परवीन वसंत बुढीया आणि वसंत बुटीया हे तेथे आले व त्यांनी शिवीगाळ सुरू केली.

यावेळी वाद सोडवण्यास आलेले रोहितचे वडील गोपाल यांच्या डोळ्याजवळ राजेशने दगड मारला, तर रोहितच्या पायावर लोखंडी गजाने व डोक्यात पकडीने वार केले. रोहितची आई नंदा यांना अरविंदने लाकडी दांडक्याने मारहाण केली. या गोंधळात परवीन बुढीया याने रोहितच्या खिशातील ६ हजार ५०० रुपयांची रोकड जबरदस्तीने काढून घेतली आणि पोलीस केस मागे न घेतल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. जखमींवर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून, कोतवाली पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# बाजारपेठेत स्वच्छतागृहाअभावी महिलांची कुचंबणा

नगर – शहरातील कापड बाजार, गंज बाजार, नवीपेठ आणि चितळे रोड या प्रमुख व्यापारी परिसरांमध्ये खरेदीसाठी महिलांची मोठी गर्दी होते. मात्र, या परिसरात सार्वजनिक स्वच्छतागृह नाही. त्यामुळे बाजारपेठेत आलेल्या महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. महापालिकेकडे वारंवार मागणी करुनही या परिसरात स्वच्छतागृह उभारण्याबाबत महापालिका दखल घेत नाही. त्यामुळे महिलांची हेळसांड व सन्मान न राखणाऱ्या महापालिका प्रशासनाविरोधात नागरिकांमधून रोष वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर कापड बाजार, गंज बाजार, नवीपेठ आणि चितळे रोड या परिसरात महापालिकेने स्वच्छतागृह उभारुन महिलांसाठी सुविधा निर्माण कराव्यात, अशी मागणी नगरसेविका सुजाताताई महेंद्र पडोळे यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील कापड बाजार, गंज बाजार, नवीपेठ व चितळे रोड हे शहरातील प्रमुख व्यापारी आणि गर्दीचे परिसर आहेत. या भागात शहरासह उपनगर आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने महिला खरेदीसाठी येतात. तसेच व्यापारी, ग्राहक आणि नागरिकांची दिवसभर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र, या परिसरात महिलांसाठी सार्वजनिक सुलभ शौचालयांची पुरेशी सुविधा नसल्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि इतर नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. महिलांचा सन्मान, सुरक्षितता आणि मूलभूत नागरी सुविधा लक्षात घेता या परिसरात सार्वजनिक सुलभ शौचालयांची सुविधा उपलब्ध करणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संबंधित परिसराची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी महिलांसाठी सार्वजनिक सुलभ शौचालये उभारण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने सूचना द्याव्यात, अशी मागणी नगरसेविका पडोळे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्याच्या आवळल्या मुसक्या

## तब्बल ४ होता फरार, 'अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षा'ची कारवाई

नगर –पाथर्डी तालुक्यातील मोहरी येथून चार वर्षांपूर्वी एका अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेणाऱ्या खंडू गहीनाथ पालवे या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने ही कारवाई केली. गेल्या चार वर्षांपासून बेपत्ता असलेल्या या मुलीचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

१४ सप्टेंबर २०२२ रोजी आरोपी खंडू गहीनाथ पालवे (रा. मोहरी, ता. पाथर्डी) याने एका अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेले होते. या प्रकरणी मुलीच्या पालकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक पोलिसांना बऱ्याच दिवसांनंतरही मुलीचा आणि आरोपीचा शोध घेण्यात यश आले नव्हते. गुन्हा संवेदनशील असल्याने आणि मानवी तस्करीचा संशय आल्याने, या प्रकरणाचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे सोपवण्यात आला होता. या गुन्ह्यात मानवी तस्करीचे वाढीव कलमही लावण्यात आले होते.

पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या पथकाने या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला. पोलिसांनी तांत्रिक माहिती गोळा करून आणि गुप्त बातमीदारांकडून माहिती घेत आरोपीचा माग काढण्यास सुरुवात केली. अखेर पोलिसांच्या अथक प्रयत्नांना यश आले असून, त्या मुलीचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले.

पीडित मुलीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी पाथर्डी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक किरण शिंदे, पोलीस अंमलदार शकील शेख, समीर सय्यद, अर्चना काळे आणि छाया रांधवन यांच्या पथकाने केली.


# प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनच्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. ४५ दिवसांचे कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या २१ उमेदवारांपैकी १८ उमेदवारांना रोजगार मिळाला.

यावेळी सहाय्यक आयुक्त योगेश उगले, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचे दिवाकर भोयर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपप्राचार्य सोमनाथ जाधव तसेच जिल्हा रोजगार मेळावा कार्यकारी समितीचे समन्वयक अमोल घोलप उपस्थित होते.यावेळी योगेश उगले यांनी व्यावसायिक कौशल्य आत्मसात केल्यास तरुणांना आर्थिक प्रगती साधता येईल, असे सांगितले. प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनकडून कौशल्य प्रशिक्षणाचे कार्य उत्तमरीत्या सुरू असून प्रशिक्षणार्थींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात 'आयएमए नगर'तर्फे निषेध

## २० जुलैला लाक्षणिक संप; ओपीडी, नियोजित शस्त्रक्रिया बंद, तातडीची सेवा मात्र सुरू



डॉ. धनंजय कुलकर्णी

नगर – डोंबिवली महानगरपालिका रुग्णालयात डॉक्टरांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेने वैद्यकीय क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. डॉक्टरांवरील वाढत्या हल्ल्यांना चाप लावण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय संघटनेने पुकारलेल्या लाक्षणिक संपाला आयएमए, अहिल्यानगर शाखेने पाठिंबा दिला आहे. त्याच्या निषेधार्थ २० जुलै रोजी सकाळी ६ वाजल्यापासून २४ तासांचा लाक्षणिक संप करण्यात येणार असल्याची माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी व सचिव डॉ. अमित करडे यांनी दिली.

या संपाच्या काळात सर्व बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) तसेच नियोजित शस्त्रक्रिया बंद राहणार आहेत. मात्र, रुग्णांच्या जीविताशी संबंधित तातडीची व अत्यावश्यक रुग्णसेवा सुरू ठेवण्यात येणार आहे. डॉक्टरांवरील हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत, असा स्पष्ट संदेश या आंदोलनातून देण्यात येणार आहे.

डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरणात सेवा बजावता यावी, यासाठी शासनाने कठोर पावले उचलण्याची गरज आहे. डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात वैद्यकीय क्षेत्रातील सर्व घटकांनी एकजुटीने उभे राहावे, असे आवाहन डॉ. धनंजय कुलकर्णी व डॉ. अमित करडे यांनी केले आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिकेचे नाविन्यपूर्ण उपक्रम नागरिकांसाठी उपयुक्त : चित्रा कुलकर्णी



राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी यांचे स्वागत करताना महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी, उपसचिव धनंजय पुराड–उपाध्ये, कक्ष अधिकारी सचिन पोतदार यांनी १५ जुलै रोजी अहिल्यानगर महानगरपालिकेस भेट देऊन आढावा बैठक घेतली. अहिल्यानगर महापालिकेचे नाविन्यपूर्ण उपक्रम नागरिकांसाठी उपयुक्त असल्याचे सांगत आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी महापालिकेच्या उपक्रमांचे कौतुक केले.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना पारदर्शक आणि वेळेत सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेने सन २०२५–२६ या वर्षासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांमुळे नागरिकांना घरबसल्या विविध सेवा, माहिती आणि मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे, अशी माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, उपायुक्त मेहेर लहारे, सिस्टीम मॅनेजर अंबादास साळी उपस्थित होते.

या बैठकीत महानगरपालिकेमार्फत नागरिकांना आरटीएस अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवा व त्याबाबतच्या उपाययोजनांची माहिती सादर करण्यात आली. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरटीएस प्रणालीअंतर्गत आतापर्यंत एकूण १५४७ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी ३१६ अर्जांवर कार्यवाही सुरू आहे. ३१६ अर्जांपैकी १५१ अर्ज झशपवळपस असून, निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी ९७.६७ टक्के आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नागरिकांना आरटीएस सेवा अधिक सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच सन २०२५–२६ या वर्षातील नाविन्यपूर्ण उपक्रमांबाबतही आढावा बैठकीत सविस्तर माहिती देण्यात आली.

# कत्तलीसाठी चालवलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका

## टेम्पोसह ३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत, केडगाव बायपास जवळ कारवाई

नगर – नगर – पुणे महामार्गावर केडगाव बायपास परिसरात कत्तलीच्या उद्देशाने निर्दयपणे वाहतूक केल्या जाणाऱ्या ६ गोवंशीय जनावरांची गोरक्षकांनी कोतवाली पोलिसांच्या मदतीने सुटका केली आहे. या प्रकरणी दोघांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गोरक्षक अमर शिवाजी सैंदर (वय २४, रा. गुलमोहर रोड, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा त्याच्या मित्रासोबत पारनेरहून अहिल्यानगरकडे येत असताना, त्यांना सुपा येथे एक पांढऱ्या रंगाचा महिंद्रा बोलेरो पिकअप टेम्पो (क्र.एमएच ०४ ए वाय ११०१) हा संशयास्पद स्थितीत दिसला. टेम्पोमधून जनावरांचा आवाज येत असल्याने त्यांनी पाठलाग करून नगर–पुणे रस्त्यावरील केडगाव बायपास च्या पुढे असलेल्या 'स्वीट होम' जवळ टेम्पो थांबवला. यावेळी टेम्पो चालक शाहानूर रहेमान सय्यद (रा. घासगल्ली) आणि त्याचा साथीदार आसीफ शबीर शेख (रा. खाटीक गल्ली) हे गाडी सोडून पळून गेले.

फिर्यादीने डायल ११२ वरून पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन टेम्पोची तपासणी केली असता, त्यात चारा–पाण्याची कोणतीही सोय न करता, अत्यंत दाटीवाटीने कोंबलेली ६ जर्सी आणि गावरान जातीची गोवंशीय जनावरे आढळून आली. पोलिसांनी २ लाख रुपयांचा टेम्पो आणि १ लाख १५ हजार रुपये किमतीची जनावरे असा एकूण ३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून फरार आरोपींविरुद्ध प्राणी छळ प्रतिबंधक कायदा व महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

